| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ६७ वा | बुधवार, दिनांक २७ मे २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

### सुप्रीम कोर्टाचा महत्त्वाचा निकाल

## एसआयआर मोहीम वैध असल्याचा निर्वाळा, निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे समर्थन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : बिहार, पश्चिम बंगालमधील मतदार याद्यांच्या विशेष तपासणीवरून सुरू असलेल्या मोठ्या वादावर सर्वोच्च न्यायालयाने आज आपला अंतिम आणि ऐतिहासिक निकाल सुनावला आहे. निवडणूक आयोगाद्वारे राबवण्यात आलेल्या मतदार यादीच्या 'विशेष गहन पुनर्पडताळणी' प्रक्रियेला न्यायालयाने पूर्णपणे वैध आणि संवैधानिक ठरवले आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने याचिका फेटाळताना स्पष्ट केले की, केवळ ही प्रक्रिया मतदार यादी सुधारण्याच्या सामान्य प्रक्रियेपेक्षा थोडी वेगळी आहे, म्हणून तिला 'अल्ट्रा वायर्स' म्हणजेच बेकायदेशीर किंवा अवैध ठरवून रद्द करता येणार नाही.**



#### निवडणूक आयोगाचे अधिकार अबाधित

न्यायालयाने म्हटले की, निवडणूक आयोग ही एक स्वायत्त आणि संवैधानिक संस्था आहे. देशात निष्पक्ष, पारदर्शक आणि बोगस मतदारांशिवाय शुद्ध मतदार यादी तयार करण्याचा पूर्ण अधिकार आयोगाला आहे. विशेष परिस्थितीमध्ये सामान्य प्रक्रियेपेक्षा वेगळी पद्धत अवलंबणे हे संविधानाच्या किंवा लोकप्रतिनिधी कायद्याच्या विरोधात नाही. त्यामुळे मोहीम कायदेशीररीत्या पूर्णपणे योग्य आहे.

#### मागितलेली कागदपत्रे मनमानी नाहीत

बिहारमध्ये ही प्रक्रिया सुरू झाल्यानंतर, निवडणूक आयोगाने मतदारांची पडताळणी करण्यासाठी निश्चित केलेल्या अटींना आव्हान देण्यात आले होते. यावर न्यायालयाने सांगितले की, आयोगाने पडताळणीसाठी ११ अधिकृत दस्तऐवज निश्चित केले होते आणि नंतर आमच्या आदेशानुसार यात 'आधार कार्ड'चाही समावेश करण्यात आला. त्यामुळे निवडणूक आयोगाने मागितलेली कागदपत्रे मनमानी किंवा जाचक आहेत, हा याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद आम्ही स्वीकारू शकत नाही.

#### वोटर लिस्टमधून नाव हटणे म्हणजे नागरिकत्व जाणे नव्हे!

याचिकाकर्ते आणि विरोधी पक्षांनी असा आरोप केला होता की, निवडणूक आयोगाची 'डखठ' मोहीम म्हणजे एका प्रकारे 'मागच्या दाराने केलेली नागरिकत्व तपासणी' आहे. यावर कोर्टाने अत्यंत महत्त्वाची टिप्पणी केली. सुप्रीम कोर्टाने म्हटले की, या प्रक्रियेत एखाद्या व्यक्तीचे नाव मतदार यादीतून हटवले गेले, तर त्याचा अर्थ असा अजिबात होत नाही की त्या व्यक्तीचे भारताचे नागरिकत्व संपले आहे. या निकालामुळे लाखो नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. नागरिकत्व ठरवणे निवडणूक आयोगाचे काम नाही खंडपीठाने स्पष्ट केले की, निवडणूक आयोगाचे अधिकार क्षेत्र मर्यादित आहे. एखाद्या व्यक्तीचे नाव मतदार यादीत जोडायचे की काढायचे, याच मर्यादेत आयोग नागरिकत्वाचा विषय पाहू शकतो. एखादी व्यक्ती भारताचा नागरिक आहे की नाही, हे ठरवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाकडे नाही, तर ते काम केवळ संविधानाने नियुक्त केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याचे आहे.

#### लोकप्रतिनिधी कायद्याचे उल्लंघन नाही

अदालतीने आपल्या निर्णयात स्पष्ट केले की, निवडणूक आयोगाची ही विशेष मोहीम 'जन प्रतिनिधित्व अधिनियम' आणि त्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही नियमांचे उल्लंघन करत नाही.

गेल्या वर्षी निवडणूक आयोगाने बिहारमध्ये मतदार याद्यांमधील त्रुटी आणि बोगस मतदारांना हटवण्यासाठी हे विशेष अभियान सुरू केले होते, ज्याला नंतर इतर राज्यांतही वाढवण्यात आले. या मोहिमेत २००२-२००३ च्या याद्यांशी कौटुंबिक संबंध सिद्ध करण्याची अट असल्याने वाद निर्माण झाला होता, ज्यावर आज सर्वोच्च न्यायालयाने अंतिम पडदा टाकला आहे.

## लातूरच्या शैक्षणिक लौकिकावर आघात सहन करणार नाही : अमित देशमुख

### उद्योग भवन परिसरात काँग्रेसची चिंतन बैठक; लातूर पॅटर्नच्या समर्थनाची भूमिका

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर पॅटर्न हा विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि संस्थाचालक यांच्या अथक परिश्रमातून घडलेला आहे. नीट पेपरफुटी प्रकरणात एखाद्या व्यक्तीची चूक झाली म्हणून संपूर्ण लातूर पॅटर्नच्या लौकिकाला धक्का लागला आहे, असे मानण्याचे कोणतेही कारण नाही. या प्रकरणाची चौकशी सुरू असून विषय न्यायप्रविष्ट आहे. यात जे कोणी दोषी असतील त्यांना कायद्यानुसार कठोर शिक्षा होईलच; मात्र तत्कालीन राजकीय फायद्यासाठी लातूरच्या शैक्षणिक लौकिकाला धक्का पोहोचेल अशी विधाने कोणीही करू नयेत. संकटाच्या काळात आम्ही लातूरमधील विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि स्थानिक व्यावसायिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, असा ठाम विश्वास माजी पालकमंत्री तथा आमदार अमित देशमुख यांनी व्यक्त केला.



नीट पेपरफुटी प्रकरणानंतर ट्युशन एरियातील क्लास चालक, हॉस्टेल चालक, विविध व्यावसायिक, विद्यार्थी आणि पालकांमध्ये निर्माण झालेल्या भीती व संभ्रमाचे वातावरण दूर करण्यासाठी दि. २६ मे रोजी सायंकाळी लातूर शहरातील अष्टविनायक मंदिराशेजारील गणेश हॉल (उद्योग भवन परिसर) येथे काँग्रेस पक्षाच्या वतीने व्यापक चिंतन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीचे नेतृत्व माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले. यावेळी त्यांनी ट्युशन क्लासेस, वसतिगृहे, झेरॉक्स व पुस्तक दुकाने, अभ्यासिका चालक व मालक तसेच संबंधित घटकांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी आणि समस्या जाणून घेतल्या.

लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी उपस्थितांना धीर देताना सांगितले की, नीट पेपरफुटीचे प्रकरण समोर आल्यानंतर मनाला मोठ्या वेदना झाल्या. शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि संस्थाचालकांनी रक्ताचे पाणी करून लातूर पॅटर्न उभा केला आहे. आज उद्योग भवन परिसर हा लातूरच्या अर्थव्यवस्थेचा आणि शिक्षण व्यवस्थेचा महत्त्वपूर्ण भाग बनला आहे. सीबीआय आणि न्यायालय दोषींना कठोर शिक्षा होईलच; परंतु यामध्ये लातूरमधील सर्वसामान्य ट्युशन चालक, विद्यार्थी आणि स्थानिक व्यावसायिकांचा कोणताही दोष नाही. आम्ही येथील संपूर्ण शैक्षणिक व व्यावसायिक विश्वाच्या पाठीशी कायम आहोत.

लातूर शहर महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी लातूर पॅटर्नची बाजू ठामपणे मांडली. ते म्हणाले की, काही नतद्रष्ट मंडळी जाणूनबुजून लातूर पॅटर्नची बदनामी करत आहेत. आजूबाजूच्या जिल्ह्यांतील अनेक नागरिक लातुरात येऊन स्थायिक झाले आहेत. देशात कोटा आणि लातूर ही शहरे दर्जेदार शिक्षणासाठी प्रसिद्ध आहेत. सध्या सुरू असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणात पुणे आणि इतर जिल्ह्यांतील लोकांचाही सहभाग असल्याचे समोर आले आहे. असे असताना केवळ लातूरचे नाव अधिक प्रमाणात बदनाम केले जाणे दुर्दैवी असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

या महत्त्वपूर्ण चिंतन बैठकीस महापौर सौ. जयश्री सोनकांबळे, उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे, महापालिकेतील काँग्रेसचे सभागृह नेते विजयकुमार साबदे, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अभय साळुंके, लातूर शहर काँग्रेस अध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर, ॲड. किरण जाधव, लातूर को-ऑप इस्टेटचे अध्यक्ष अशोक लोया, उपाध्यक्ष अभय शहा, तसेच लातूर पॅटर्नशी संबंधित हजारो विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राध्यापक आणि व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पेट्रोल संपल्याने थांबलेल्या दुचाकीला भरधाव कारची धडक!

### बाप-लेकाची शेवटची सफर

**औसा/प्रतिनिधी :** दुचाकीतील पेट्रोल संपल्याने रस्त्याच्या कडेला थांबलेल्या दुचाकीला पाठीमागून येणाऱ्या एका भरधाव कारने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातामध्ये ५० वर्षीय वडिलांचा जागीच मृत्यू झाला. तर सुदैवाने मुलगा थोडक्यात बचावला. अपघातानंतर कारसह चालक घटनास्थळावरून फरार झाला असून, औसा पोलिस त्याचा शोध घेत आहेत. ही घटना मंगळवारी औसा-सोलापूर महामार्गावर सायंकाळी घडली.

पोलिसांनी सांगितले की, बोरफळ येथील रहिवासी व्यंकट मारुती यादव (वय ५०) हे आपल्या मुलासह (एम.एच. १२ बी.यू. २१४५) या दुचाकीवरून शिवली मोडकडून गावाकडे येत होते. मंगळवारी सायंकाळी ४:३० ते ५ वाजण्याच्या सुमारास बोरफळ येथील उड्डाणपुलाजवळील पेट्रोल पंपाशेजारी त्यांच्या दुचाकीतील पेट्रोल संपले. पेट्रोल आणण्यासाठी मुलगा रस्त्याच्या बाजूला प्लास्टिकची रिकामी बाटली शोधत होता, तर व्यंकट यादव हे दुचाकी शेजारी उभे होते.

त्याचवेळी तुळजापूरकडून येणाऱ्या एका भरधाव कारने उभे असलेल्या यादव यांना आणि त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या धडकेत व्यंकट यादव रक्ताच्या थारोळ्यात पडले. वडिलांची ही अवस्था पाहून मुलाने हंबरडा फोडला. स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्यांना तातडीने ग्रामीण रुग्णालयात नेण्यात येत होते, मात्र वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक रेवण डमाले, अंमलदार मारुती घुटे यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

**कुटुंब उघड्यावर, परिसरात हळहळ...**

मयत व्यंकट यादव हे कुटुंबातील एकमेव कर्ते पुरुष होते. शिवली मोडवरील उड्डाणपुलाखाली वडापावची गाडी चालवून ते आपल्या वयोवृद्ध आई-वडील, पत्नी, चार मुली व एका मुलाचे पोट भरत होते. नेहमीप्रमाणे वडापावची गाडी बंद करून ते मुलासह घरी चालले होते. पण काळाने त्यांच्यावर झडप घातली. मुलगा पेट्रोलची बाटली शोधायला गेला म्हणून सुदैवाने वाचला, मात्र डोळ्यांदेखत पित्याचा अंत झाला.

### प्रभात किरणे

गुरु तैशी शिष्य,दिसे जिकडे तिकडे
अमंगळ घटित घडती,येथे दिन रात
अपुरी पडती संस्कारास माय बाप
मानवा अधोगती,रोकावे अति घातक

-इंजि. नागनाथ कलवले
लातूर मो: ९७६४७ ८८२८८

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



मारुती सुझुकी इंडियातील कर्मचारी - वर्क फॉर्म होम...

### चिमटा दयाचा



लातूरच्या पुण्याईत डॉक्टरमंडळींचा हात होता! आलिकडील प्रकरणे पाहुन देव समजणाऱ्या काही डॉक्टरवरील विश्वास उडाला!!

## लोकनेते विलासराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त

# अभिवादनास लोटला जनसमुदाय!

**लातूर/ प्रतिनिधी :** मंगळवार, दि. २६ मे २०२६ महाराष्ट्राच्या राजकारणातील लोकाभिमुख नेतृत्व, ग्रामीण भागाशी घट्ट नाळ जोडून जनसामान्यांना केंद्रस्थानी ठेवणारे माजी मुख्यमंत्री आणि माजी केंद्रीय मंत्री लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांची आज मंगळवार, दि. २६ मे रोजी ८१ वी जयंती अत्यंत भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. राजकारण, प्रशासन आणि महाराष्ट्राच्या विकासाचा समतोल साधत प्रगतीला नवी दिशा देणाऱ्या या लाडक्या नेत्याच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी बाभळगाव येथील विलासबागेतील स्मृतीस्थळी कुटुंबीय, नातेवाईक आणि लातूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या हजारो स्नेही मंडळींच्या उपस्थितीत भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

सोमवार दि. २६ मे रोजी सकाळी ९ वाजता विलासबाग, बाभळगाव येथेभावस्वरांजली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आदरणीय विलासराव देशमुख आणि देशमुख परिवारावर प्रेम करणारे स्नेही, मित्र, हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांनी स्मृतीस्थळी पुष्पांजली अर्पण करून आपल्या आवडत्या नेत्याला आदरांजली वाहिली.









प्रारंभी, सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख, विलास साखर कारखाना चेअरमन वैशालीताई देशमुख, लातूर ग्रामीणचे माजी आमदार धीरज विलासराव देशमुख, सौ. दीपशिखा देशमुख, विनायकराव पाटील, उल्हासदादा पवार, जयसिंह देशमुख, अभिजीत देशमुख आणि डॉ. सारिका देशमुख, चि. वंश, कु. दिवीयाना, यांनी आदरणीय विलासराव देशमुख यांना पुष्पांजली अर्पण केली.

पं. जितेंद्र अभिषेकी यांच्या शिष्य परिवारातील ज्येष्ठ शिष्य सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक हेमंत पेंडसे व त्यांचे सहकारी यांनी शास्त्रीय संगीताच्या माध्यमातून 'भावस्वरांजली' सादर केली, यातून आदरांजली सभेला भावपूर्ण स्वरूप प्राप्त झाले. यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी आमदार वैजनाथराव शिंदे, महापौर जयश्री सोनकांबळे, उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे यांच्यासह लातूर जिल्हा आणि संपूर्ण महाराष्ट्रातून विविध क्षेत्रातील हजारोंच्या संख्येने आलेल्या स्नेहमंडळींनी लोकनेत्याला पुष्पांजली अर्पण करून आदरांजली वाहिली.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## महागाईतर वाढणार..

जगात इंधनाचा तुटवडा व वाढत्या किंमतीमुळे केवळ भारतात नाही तर जगात महागाई वाढणार आहे हे सत्यच आहे. याला भविष्यकाराची गरज नाही, ज्या-ज्यावेळी इंधनाचे दर वाढतात, त्यावेळी वाहातुक दरात वाढ होते. प्रत्येक वस्तू ही ट्रान्सपोर्टींग होते. त्यामुळे स्थलांतरीत करणे म्हणजे इंधन लागते. त्यामुळे महागाई वाढते, बाजारातील वस्तूच्या किंमती वाढल्या जातात हे साधे गणित आहे. ज्यावेळी इंधनाचे दर वाढले की, सर्वच वस्तूंच्या दरात आपोआप वाढ होते. वाहातुकीमुळे सर्वच वस्तूंचे दर वाढतात. त्यामुळे वाढीस दरास समोरे गेले पाहिजे. वाढीव दर वाढले म्हणून टिका करण्यापेक्षा ते स्विकारले पाहिजे. पर्याय दुसरा नाही. तसे पाहिले तर जगात युद्धामुळे अनेकांनी विविध उपायोजना शोधल्या आहेत, आमलात आणल्या आहेत. भारतात इंधनाचे दर कमी आहेत. श्रीलंका, पाकिस्तानात दर चार पटीने अधिक आहेत. काही देशाने इंधनाच्या वाढत्या दरामुळे लॉकडावुन केले आहे. कोणी फिरायाचे नाही. पेट्रोल व डिझेलचा वापर कमी केला. आवश्यकता असेल तरच वापर केला जात आहे. त्यामुळे इंधनाची काटकसर करून महागाईवर मात केली जात आहे. भारतात उपायोजना कमी व ओरड अधिक केली जाते. आजही प्रचंड प्रमाणात गाड्याचा वापर होताना दिसून येत आहे. सरकारी व खाजगी मंडळी मोठ्या प्रमाणात पेट्रोल व डिझेलच्या गाड्याचा वापर करीत आहे. नेते मंडळींचा समावेश अधिक दिसून येतो. एकतर पायी चालण्याची सवय नाही. दुसरे गाड्याचा ताफा घेवुन फिरल्याशिवाय करमत नाही. नेताच वाटत नाही अशा मनस्थितीत दिसून येत आहेत. त्यामुळे वेळीच कोणीही सावध होत नाही. भारतात मोठ्या प्रमाणात तुटवडा नाही. मानसाची मानकिता आता इंधन मिळणार नाही म्हणून टँक फुल्ल करीत आहेत. वास्तविक आपल्या देशात टंचाई भासणार नाही याची शाश्वती कोणी देणारे नाहीत. वापर कमी करा म्हटले तर यापुढे मिळणार नाही अशी भिती घातली जात आहे. वास्तविक युद्ध चालू आहे. समाप्त झाले नाही. ट्रम्प एक बोलत आहेत तर दुसरेच करीत आहेत. त्यामुळे विश्वास आता दिसून येत नाही. त्यामुळे जो पर्यंत कायमस्वरूपी युद्ध संपणार नाही तो पर्यंत इंधनाचे संकट असणार आहे. याचा परिणाम हा महागाईवर होणार असून महागाई वाढणार आहे. याबाबत भारतात कोणाचेही सरकार असले तरी काहीच करू शकणार नाही. इंधनाची कमतरता व दरवाढीचा परिणाम दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्यालाच काही नियम लागू करून घेण्याची गरज आहे. आपल्यावर निर्बंध घालण्याची गरज आहे. महागाई वाढली म्हणून कोणी उपाशी राहाणार नाही. असे जरी असले तरी विचारपुर्वक चालले पाहिजे. पंतप्रधानावर टिका करण्यापेक्षा आपण महागाईवर मात करू शकतो का? याचा विचार केला पाहिजे. भारतात इंधनाच्या विहीरी नाहीत. गॅसचे उत्पादन होत नाही. ज्या बाबी सतत आयात कराव्या लागतात. त्यावस्तू बाबत परावलंबि असल्याने आपला हक्क राहात नाही. ज्यावेळी भारतात उत्पादन होईल त्याच वेळी याचे दर ठरविण्याचा अधिकार भारतीयांना असणार आहे. जागतिक स्तरावरील पैशाच्यामुल्यावरून दर ठरविले जातात. त्यामुळे वास्तविक सत्तर वर्षापुर्वीचे दर व सध्याचे दरात किती पटीने वाढ दर्शविली जाते. महागाई वाढली तरी त्यांना मिळणारी सॅलरी, मजुरी त्या प्रमाणात वाढली आहे. पुर्वी व्यसने नव्हती. आता अनेक व्यसने लागली, चैन करण्याची सवय लागली. पुर्वी एवढी दारू मद्याचे दुकान होते का? बार होते का? ढाबे होते का? पानपट्ट्या होत्या का? आता लातूरच्या मध्यभाग छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ वाईनशॉप व बिअरबार किती आहेत याचा अभ्यास करावा. आकडा आम्ही सांगत नाही तर तुम्ही शोध घ्यावा. त्याच प्रमाणे मद्याची एक लहान बाटलीची किंमती वाढल्या कोणी ओरड केली. मोर्चा काढला. निषेध केला. पिणारे कोण आहेत? तेच जागतिक युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधनाचे दर मोठया प्रमाणात वाढले नसताना किती टिका होते. माणसाला संकटाला समोरे जाण्याची तयारीच दिसून येत येत नाही. लागलीच महागाई वाढली. का वाढली. यामागे सत्य कारण काय आहेत याचा विचार केला जात नाही. महागाईला लगाम लावता येतो. अनेकानेत्यांनी, मंत्री, आमदार, खासदार, अध्यक्षांकडे किती गाड्या आहेत, चार घरच्या एक सरकारी! एवढ्या चारचाकीची गरज आहे का? मुळात काय झाले एक तर परिस्थितीला समोरे जाण्याची तयारी नाही. दुसरे असे की, परिस्थिती समजुन घेतली जात नाही. विनाकारण टिका व सोसलमिडीयावर लागलीच लाईव्ह प्रदर्शन सुरू केले जाते. वस्तूस्थिती समजून घ्या. पुर्वी भागत होते आता का नाही. पुर्वी व्यसने नव्हती आता अनेक आहे. पुर्वी खर्चात काटकसर केली जात होती, आता नाही. हे यामागील गणित आहे. त्यामुळे कितीही मोबादला द्या. कितीही सॅलरी वाढवा, कितीही मजुरी वाढवा कमी पडते कारण विनाकारण खर्च वाढला आहे हे लक्षात घेतले पाहिजे. युद्धामुळे संकट आले असताना कोणीही काटकसर करीत नाही. रस्त्यावर कितीतरी गाडया पळताना दिसून येतात. ते पळतात म्हणजे त्यात इंधन भरल्याने पळतात. इंधन नाही म्हणून गाड्या उभ्या आहेत असे झाले नाही. ओरड मात्र चालू आहे हे योग्य नाही. परिस्थितीच तशी निर्माण झाल्याने प्रत्येकांनी समजुन घेतले पाहिजे. ती न घेता महागाई वाढल्याची ओरड करणे योग्य नाही. प्रत्येकांनी परिस्थिती समजुन घेवुन वाटचाल केली पाहिजे. काही झाले तरी हे संकट दिर्घ काळ राहाणार नाही. नुकताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा परदेश दौरा झाला. निर्माण झालेल्या परिस्थितीवर मार्ग काढण्यासाठीच दौरा होता. ट्रम्प हे पक्के विचाराचे नाहीत, इराण छोटे राष्ट्र असून देशाभिमानी जनता असल्याने महासत्तेशी लढा देत आहे. त्यामुळे इंधनाचे संकट दिर्घ काळ राहणार नाही. परिस्थितीशी लढले पाहिजे. समजुन घेतले पाहिजे. सध्याला भडकावणारे वक्तव्य केले जात असून परिस्थिती समजुन वाटचाल करणे काळाची गरज आहे.

# रोज प्या एक डिटॉक्स ड्रिंक !



सध्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी अनेकजण डिटॉक्स ड्रिंक्सचा आहारात समावेश करताना दिसतात. सतत बाहेर-चे खाणे, अपुरी झोप, कमी पाणी पिणे आणि धावपळीची जीवनशैली यामुळे शरीर थकलेले आणि जड वाटू शकते. अशावेळी हलकी आणि शरीराला हायड्रेट ठेवणारी पेये उपयुक्त ठरतात. डिटॉक्स ड्रिंक्स म्हणजे शरीराला ताजेतवाने वाटण्यासाठी, पाणीपुरवठा टिकवून ठेवण्यासाठी आणि हलके वाटण्यासाठी घेतली जाणारी नैसर्गिक पेये.

अशा ड्रिंक्समुळे शरीराला पुरेसे पाणी मिळण्यास मदत होते. काही पेयांमध्ये फळे, भाज्या किंवा औषधी वनस्पती वापरल्या जात असल्यामुळे त्यातून शरी-राला विविध पोषक घटक मिळू शकतात. उन्हाळ्यात शरीर गरम झाल्यास किंवा सतत थकवा जाणवत असल्यास थंड आणि हलकी डिटॉक्स पेये फ्रेश वाटतात. तसेच सकाळी अशी पेये घेतल्यावर दिवसभर हलके वाटते.

लिंबू आणि पुदिना

एक ग्लास पाण्यात लिंबाचा रस, काही पुदिन्याची पाने आणि थोडे मध घालून हे पेय तयार करता येते. हे ड्रिंक उन्हाळ्यात शरीराला फ्रेश ठेवण्यास मदत करू शकते.

काकडी आणि सैंधव मीठ

पाण्यात काकडीच्या चकत्या आणि थोडं सैंधव मीठ घाला. हे पेय थंड आणि हलके वाटते. उन्हाळ्यात शरीराला गारवा देण्यासाठी अनेकांना हा पर्याय आवडतो.

जिरे आणि धणे

पोट साफ करण्यासाठी सगळ्यात सोपं आणि मस्त पेयं आहे. धणे- जिऱ्याची पूड करुन ठेवा आणि एक कप पाण्यात उकळवून गाळून प्या. चवही चांगलीच लागते फक्त अति प्रमाणात पिऊ नका.

# जेवणात तोंडी लावण्यासाठी ५ मिनिटांत करा खमंग अन् चटपटीत 'दही मिरची'



वरण-भात, भाजी-पोळी किंवा साधा पराठा... जेवताना ताटात तोंडी लावायला जर चटपटीत 'दही मिरची' असेल, तर जेवणाची लज्जत कित्येक पटींनी वाढते. अनेकदा तोंडी लावायला आपण लोणचे किंवा पापड घेतो, पण मिनिटांत तयार होणारी ही चमत्कारीक दही मिरची तुमच्या साध्या जेवणालाही भन्नाट चव देईल. हॉटेलसारखी चविष्ट आणि चटपटीत 'दही मिरची' कशी करायची याची सविस्तर आणि सोपी रेसिपी खालीलप्रमाणे आहे:

ही मिरची मध्यम तिखट आणि आंबट-गोड चवीची असल्यामुळे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व जण ती आवडीने खातात.

**आवश्यक साहित्य**

पोपटी मिरच्या - थोड्या जाड आणि मध्यम तिखट प्रकारच्या (आवश्यकतेनुसार)

तेल - १ मोठा चमचा

मोहरी हिंग - १ चमचा

दही - ३ ते ४ मोठे चमचे (चांगले फेटून घेतलेले)

मसाल्यांची भरड - जिरे, मिरी, बडीशेप आणि धने (जाडसर कुटलेले)

मसाले - लाल तिखट, हळद आणि आमचूर पावडर

मीठ - चवीनुसार

**कृती आणि तयारी**

१. **मिरच्यांची तयारी:** सर्वप्रथम मिरच्या स्वच्छ धुवून आणि कपड्याने पुसून सुकवून घ्या. त्यानंतर सर्व मिरच्यांचे देठ काढून घ्या आणि सुरीने त्यांच्यामध्ये एक छोटी चीर मारून घ्या, जेणेकरून मसाला आतपर्यंत व्यवस्थित बसेल.

२. **मसाल्याची भरड:** खलबत्त्यामध्ये जिरे, मिरी, बडीशेप आणि अख्खे धने एकत्र करून जाडसर भरडून घ्यावे. मिक्सरपेक्षा खलबत्त्यात कुटलेल्या मसाल्याचा सुवास आणि चव मिरच्यांना अप्रतिम येते.

३. **मिरच्या परतून घेणे:** आता गॅसवर एक पॅन गरम करायला ठेवा. त्यात एक मोठा चमचा तेल घाला. तेल गरम झाल्यावर त्यात मोहरी, हिंग आणि चिरलेल्या मिरच्या टाकून मध्यम आचेवर छान परतून घ्या, जेणेकरून त्यावर हलके पांढरे डाग पडतील.

४. **मसाले घालणे:** मिरच्या हलक्या परतल्या गेल्यानंतर, त्यात खलबत्त्यात कुटलेली मसाल्याची जाडसर भरड घाला आणि पुन्हा एकदा व्यवस्थित परतून घ्या. त्यानंतर त्यात हळद, लाल तिखट आणि चवीनुसार मीठ घाला.

५. **दह्याचा ट्विस्ट:** आता गॅसची आच अगदी मंद करा किंवा गॅस बंद करा. त्यामध्ये ३-४ चमचे फेटलेले दही घाला आणि सर्व मिश्रण झटपट एकत्र करा. (मंद आचेवर दही घातल्याने ते फाटत नाही). दह्याचे पाणी आटेपर्यंत आणि मसाल्याला छान तेल सुटेपर्यंत १ मिनिट परता.

६. **सर्व्हिंग:** शेवटी वरून चटपटीत चवीसाठी थोडी आमचूर पावडर भुरभुरा आणि मिक्स करून गॅस बंद करा. तुमची गरमागरम, लज्जतदार 'दही वाली मिरची' तोंडी लावण्यासाठी तयार आहे!

# ताजे जांभूळ निसर्गाची देणच!!

## अपचन ते ब्लड शुगर कंट्रोल अनेक त्रासांवर रामबाण



उन्हाळ्याच्या शेवटी बाजारात दिसणारे जांभूळ हे फळ चवीला आंबट-गोड असते. त्यामध्ये भरपूर पोषक घटक असतात. गडद जांभळ्या रंगाचे हे फळ शरीराला थंडावा देण्यास मदत करते. अनेकांना जांभूळ फक्त चवीसाठी आवडते, पण त्यामध्ये असलेले अँटी ऑक्सिडंट्स, लोह, कॅल्शियम, फायबर आणि जीवनसत्त्वे शरीरासाठी किती फायदेशीर असतात हे अनेकांना माहितीच नाही. जांभळामध्ये फायबरचे प्रमाण चांगले असल्यामुळे पचन सुधारण्यास मदत मिळते. पोट साफ राहण्यासाठी आणि अपचन, जडपणा यांसारख्या समस्या कमी करण्यासाठी जांभूळ उपयुक्त ठरू शकते. काही लोकांना उन्हाळ्यात भूक कमी लागते, अशावेळी जांभूळ तोंडाला चव आणण्यास मदत करते.

या फळामध्ये अँटी ऑक्सिडंट्स असल्यामुळे शरीरातील पेशींना संरक्षण मिळण्यास मदत होते. त्यामुळे त्वचा अधिक तजेलदार दिसण्यास मदत मिळू शकते. शरीरातील थकवा कमी करण्यासाठी आणि उत्साह टिकून राहण्यासाठीही जांभूळ उपयुक्त मानले जाते. जांभळामध्ये लोहाचे प्रमाण असल्यामुळे रक्तनिर्मितीस मदत होऊ शकते. विशेषतः महिलांमध्ये रक्ताची कमतरता किंवा अशक्तपणा जाणवतो, पौष्टिक आहाराचा भाग म्हणून जांभूळ खाणे फायदेशीर ठरू शकते. मासिक पाळीदरम्यान शरीरात थकवा जाणवत असल्यास पोषण देणारी फळे खाणे महत्त्वाचे असते आणि त्यात जांभूळ चांगला पर्याय ठरु शकतो.

जांभूळ त्वचेसाठीही उपयुक्त मानले जाते. त्यातील पोषक घटक त्वचेला आतून पोषण देण्यास मदत करतात. त्वचेवरील निस्तेजपणा कमी करण्यासाठी आणि नैसर्गिक चमक टिकवण्यासाठी पौष्टिक फळांचा आहारात समावेश फायदेशीर ठरतो. तसेच फायबरमुळे पचन व्यवस्थित राहिल्यास त्याचा सकारात्मक परिणाम त्वचेवरही दिसून येतो. उन्हाळ्यात शरीर गरम होणे, तोंड कोरडे पडणे किंवा थकवा जाणवणे अशा समस्या अनेकांना होतात. अशावेळी जांभूळ शरीराला थंडावा देण्यास मदत करू शकते. काही लोक जांभळाचे सरबत किंवा मीठ लावून जांभूळ खाणे पसंत करतात.

मधुमेह असलेल्या लोकांमध्येही जांभुळाबद्दल माहिती असणे गरजेचे आहे. कारण रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यासाठी हे फळ फायद्याचे असते. मात्र कोणत्याही आजारामध्ये फक्त घरगुती उपायांवर अवलंबून न राहता डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे असते. जांभूळ मर्यादित प्रमाणात खाल्ल्यास त्याचे फायदे अधिक चांगले मिळू शकतात. नैसर्गिक, चविष्ट आणि पोषणाने भरलेले जांभूळ हे फळ उन्हाळ्यात आहारात समाविष्ट करा. शरीराला ऊर्जा देण्यासोबतच त्वचेची काळजी घेण्यासाठीही हे फळ उपयुक्त आहे.

# वजन वाढू नये म्हणून साखरेऐवजी मध खाता?




आजकाल वजन कमी करायचे असो, त्वचा निरोगी ठेवायची असो किंवा हेल्दी खाण्याची सवय लावायची असो अनेक जण एखाद्या अनहेल्दी पदार्थाऐवजी हेल्दी पर्याय निवडण्याचा प्रयत्न करतात. या जर्नीत सकाळच्या कोमट पाण्यापासून चहा, डिटॉक्स ड्रिंक किंवा घरगुती पदार्थांपर्यंत मधाचा वापर वाढताना दिसतो. पण खरोखरच मध हा साखरेपेक्षा इतका चांगला पर्याय आहे का? की तो फक्त एक ट्रेंड बनला आहे? यामागचे सत्य समजून घेणे महत्त्वाचे आहे.

साखर आणि मध दोन्ही गोड पदार्थच आहेत आणि दोन्ही शरीराला ऊर्जा देतात. मात्र दोघांची रचना आणि शरीरावर होणारा परिणाम काही प्रमाणात वेगळा असतो. पांढरी साखर ही प्रामुख्याने प्रक्रिया केलेली असते, तर मध हा नैसर्गिक स्वरुपात मिळणारा पदार्थ मानला जातो. अर्थात आजकाल त्यातही रसायने आणि हानिकारक पदार्थ मिसळण्याचे प्रमाण वाढत आहे. मधामध्ये काही प्रमाणात अँटी ऑक्सिडंट्स, खनिजे आणि नैसर्गिक एन्झाइम्स असतात, जे साध्या साखरेत जवळपास नसतात.

कॅलरीजच्या बाबतीत लोकांमध्ये अनेक गैरसमज असतात. चमच्याने तुलना केली तर एक चमचा साखरेमध्ये साधारण १६ कॅलरीज असतात, तर तेवढ्याच चमचाभर मधामध्ये सुमारे २० ते २२ कॅलरीज असू शकतात. कारण मध जास्त दाट आणि वजनदार असतो. मग प्रश्न पडतो की चमचाभर मधात कॅलरीज जास्त असतानाही लोक साखरेऐवजी मध का निवडतात? याचे एक मोठे कारण म्हणजे मध साखरेपेक्षा अधिक गोड लागतो. त्यामुळे कमी प्रमाणात वापरुनही पुरेसा गोडवा मिळू शकतो. एवढेच नाही तर महत्त्वाचे कारण म्हणजे मधात इतर गुणधर्मही असतात. जे त्वचेसाठी, आरोग्यासाठी फायद्याचे असतात. मात्र साखरेत फक्त कॅलरीज असतात.

मधाचा वापर घशाला आराम देण्यासाठी, कोमट पाण्यासोबत किंवा घरगुती पेयांमध्ये मोठ्या प्रमाणात केला जातो. काही अभ्यासांनुसार मधामधील अँटी ऑक्सिडंट्स शरीरातील पेशींना संरक्षण देण्यास मदत करू शकतात. त्वचा निरोगी ठेवण्यासाठी आणि शरीरातील थकवा कमी वाटण्यासाठीही काही लोक मधाचा आहारात समावेश करतात. मात्र मध कितीही खाल्ले असे होत नाही. मधाचा वापरही मर्यादीतच करावा. जास्त प्रमाणात मध खाणेही आरोग्यासाठी वाईटच ठरते. वजन कमी होणार नाही. शेवटी त्यातही साखरेचे प्रमाण असतेच. त्यामुळे साखरेऐवजी मध घेताना त्याचे प्रमाणही कमीच ठेवा.

# आंबट - गोड महिनाभर टिकणारी चिंचेची चटणी करा झटपट

भारतात अनेक प्रकारच्या चटणी केल्या जातात. विविध चवींच्या आणि रंगाच्या या चटण्या फार चविष्ट असतात. त्यापैकीच एक भारी प्रकार म्हणजे चिंचेची छान आंबट-गोड चटणी. ही चटणी करायला सोपी आणि चवीला एकदम मस्त असते. ही चटणी चाट, समोसा, भजी, वडे किंवा इतरही स्नॅक्ससोबत खूप छान लागते. चिंचेची आंबट-गोड चव आणि मसाल्यांचा हलका स्वाद यामुळे ही चटणी खाण्याची मजा आणखी वाढते. एकदा करून फ्रिजमध्ये साठवून ठेवली तर अनेक दिवस सहज वापरता येते.

**साहित्य -** चिंच, गूळ, खजूर, लाल तिखट, जिरेपूड, काळं मीठ, साधं मीठ, पाणी

**कृती**

१. चिंच स्वच्छ धुऊन कोमट पाण्यात साधारण अर्धा तास भिजत ठेवायची. चिंच मऊ झाल्यावर हाताने चांगली कुस्करुन तिचा कोळ काढून घ्यायचा आणि बिया तसेच चोथा वेगळा करायचा. आता खजूराच्या बिया काढून घ्या आणि खजूर थोडावेळ कोमट पाण्यात भिजत ठेवा. त्यामुळे तो मऊ होतो आणि चटणीला छान घट्टपणा व चव येते.

२. एका पातेल्यात चिंचेचा कोळ घ्यायचा. त्यात कुस्करलेला खजूर आणि गूळ घालायचा. आता मिश्रण मंद आचेवर शिजू द्या. गूळ पूर्णपणे विरघळला की त्यात लाल तिखट, भाजलेली जिरेपूड, काळं मीठ आणि साधं मीठ घाला. चटणी खूप घट्ट वाटत असेल तर थोडे पाणी घाला. मिश्रण सतत ढवळत राहा. म्हणजे तळाला लागत नाही आणि मऊ होते.

३. साधारण १० ते १५ मिनिटे उकळल्यानंतर चटणीला छान रंग येतो आणि ती थोडी घट्ट होते. त्यानंतर गॅस बंद करून चटणी पूर्ण थंड होऊ द्या. तुम्हाला छान टेक्श्चर हवं असेल तर एकदा चटणी मिक्सरमधून वाटून घ्या. जास्त छान घट्टपणा येतो.

४. चिंचेची चटणी साठवून ठेवताना ती पूर्ण थंड झालेली असावी. त्यानंतर स्वच्छ आणि कोरड्या काचेच्या बाटलीत किंवा एअरटाईट डब्यात भरा. फ्रिजमध्ये ठेवल्यास ही चटणी अनेक दिवस टिकू शकते. चटणी काढताना नेहमी कोरडा आणि स्वच्छ चमचा वापरणे महत्त्वाचे असते. त्यामुळे चटणी लवकर खराब होत नाही.



# या गोष्टी न केल्यास मुलांच्या विकासात होईल नुकसान



काही गोष्टी आणि त्यांच्या आठवणी, आणि आपले बालपण यांची सांगड कशी घट्ट असते ! मातीमध्ये खेळणे, आईची नजर चुकवून गावभर, मित्र-मैत्रिणींच्या संगतीत हिंडणे.. अश्या वेळी डोक्यावरच्या उन्हाची पर्वा न करता लपंडाव, डब्बा ऐसपैसचे रंगणारे डाव..याच्या आठवणी मनातून पुसल्या जात नाहीत. त्या काळी मुलांची रोगप्रतिकारशक्ती देखील कमालीची असे. पावसात भिजून किंवा थंडगार बर्फाचा गोळा खाऊन, मातीत खेळून मुले सहजासहजी आजारी पडत नसत. आता काळ बदलला, तशी मुलांना वाढविण्याच्या तऱ्हा देखील बदलल्या. मुलांनी निसर्गाच्या सान्निध्यात राहून मोठे व्हायला हवे असे म्हणणारे आधीचे आई बाबा, आता मुले थोडीशी कळती होता क्षणीच त्यांची मैत्री टीव्ही आणि व्हिडियो गेम्सशी करून देतात. जोडीला मोबाईल फोनही असतोच. पण अश्या वेळी मुलांनी काही गोष्टींचा आनंद घ्यायलाच हवा. त्या



गोष्टींपासून त्यांना वंचित न ठेवता, त्या गोष्टी त्यांना मनसोक्त करू द्याव्यात.मुले आजारी पडतील का, याची फार काळजी न करता, पावसाच्या पाण्यामध्ये मुलांना मनसोक्त खेळू द्या. चिखलामध्ये हात घालू द्या, या गोष्टींचा आनंद काही वेगळाच असतो. पाळीव प्राण्यांशी खेळणे मुलांकरिता, त्यांच्या मनावरील ताण कमी करण्यासाठी अतिशय फायद्याचे आहे. मानसिक तणाव फक्त घरातील मोठ्यांनाच असतात असे नाही. लहान मुलांच्या मनावरही अनेक गोष्टींचे तणाव असतात. पाळीव प्राण्यांचा लळा असणे, त्यांच्या मनावरील तणाव कमी करणारे आहे. याचबरोबर प्राण्यांबद्दल लहान मुलांच्या मनामध्ये प्रेम निर्माण करण्याची जबाबदारी पालकांची असते.लहान मुलांच्या मनामध्ये अनेक वेळा चित्र विचित्र गोष्टी पाहून कुतूहल निर्माण होते. त्यावेळी मुलांना त्या वस्तूंबद्दल सांगावे, त्या वस्तूंना स्पर्श करू द्यावा. जर त्यांनी पाहिलेली, स्पर्शिलेली वस्तू आणि तो अनुभव, त्यातून मिळालेला आनंद मुलांच्या कायम स्मरणात राहील. कधी तरी मुलांना घरामध्ये पसारा घालू द्यावा. त्यांच्या मनामध्ये येतील ती खेळणी त्यांना काढू द्यावी, त्यांच्याबरोबर पालकांनी देखील खेळामध्ये सहभागी व्हावे. एखाद्या कलेची किंवा खेळाची मुलांना आवड असेल, तर ती कला आत्मसात करण्यासाठी, किंवा तो खेळ खेळण्यासाठी मुलांना प्रोत्साहन द्यावे.

# डायबिटीज आहे? या पदार्थांपासून राहा

मुंबई: भारतासह जगभरात डायबिटीज हा आजार सामान्य होत चालला आहे. डायबिटीजच्या रुग्णांची संख्या वेगाने वाढत आहे. हा आजार सायलेंट किलरसारखा आहे जो शरीराला आतून संपवतो. एकदा याच्या विळख्यात एखादा व्यक्ती सापडला तर आयुष्यभर त्याला हा आजार सोडत नाही.तुम्हालाही जर डायबिटीज असेल तर काही पदार्थांपासून दूर राहिलेले बरे. काही असे खाद्यपदार्थ असे आ-हेत ज्याच्यापासून तुम्ही दूर राहून तुमची साखर नाही वाढणार.गोड पदार्थांपासून राहा लांब-डायबिटीजच्या लोकांसाठी साखर अतिशय धोकादायक आहे. जर तुम्ही डायबिटीजचे रुग्ण आ-हात तर तुम्हाला साखर आणि साखरेपासून बनलेल्या गोष्टींपासून दूर राहिले पाहिजे. मिठाई, केक, पेस्ट्री, शुगर ड्रिंक आणि इतर गोड पदार्थांपासून दूर राहिले पाहिजे.मैद्यापासून बनवलेले पदार्थ ठरतात धोकादायक-डायबिटीज असलेल्या रुग्णांनी मैदा आणि रिफाईंड पीठापासून बनवलेले पदार्थ खाल्ले नाही पाहिजेत. यामुळे ब्लड शुगर लेव्हल वेगाने वाढते. समोसे, सफेद भात, ब्रेड, पास्ता, पिझ्झा हे पदार्थ खाऊ नयेत.सॉफ्ट ड्रिंक्सचे मर्यादित सेवन-सॉफ्ट ड्रिंक्स आणि फ्रूट ज्यूसमध्ये मोठ्या प्रमाणात शुगर आणि कार्बोहायड्रेट असतात




# सुंदर आणि मजबूत एब्स तयार करण्यासाठी

सुंदर आणि मजबूत एब्स तयार करण्यासाठी योग्य व्यायाम आणि आहाराचे संतुलन असणे अत्यंत आवश्यक आहे. आहारावर विशेष लक्ष केंद्रित करून, नियमित व्यायाम आणि जीवनशैलीत योग्य बदल केल्यास तुम्हाला नक्कीच हवे तसे ब्स मिळवता येतील.ब्स बनवण्यासाठी महत्त्वाच्या टिप्स खालीलप्रमाणे आहेत:१. योग्य आहार अत्यंत महत्त्वाचाप्रथिने वाढवा: आहारात अंडी, चिकन, मासे, डाळी आणि सोयाबीन यांसारख्या प्रथिनांचा भरपूर समावेश करा, जे स्नायू मजबूत करतात.साखर टाळा: गोड पदार्थ, कोल्ड्रिंक्स आणि प्रक्रिया केलेले अन्न पूर्णपणे टाळा.फायबर आणि पाणी: भरपूर पाणी प्या आणि आहारात हिरव्या पालेभाज्या व फळांचा समावेश करा.२. नियमित व्यायामपोटाचे व्यायाम: क्रंचेस, प्लँक्स आणि लेग रेझेस यांसारखे व्यायाम पोटाचे स्नायू बळकट करण्यासाठी उत्तम आ-हेत. कार्डिओ: पोटावरील चरबी कमी करण्यासाठी धावणे, सायकल चालवणे किंवा दोरी उडी मारणे यांसारखा कार्डिओ व्यायाम आवश्यक आहे.३. जीवनशैली आणि सवयीतणावमुक्त राहा: ताणतणावामुळे शरीरात कॉर्टिसोल नावाचा हार्मोन वाढतो, ज्यामुळे पोटावर चरबी साचू शकते. त्यामुळे पुरेशी झोप घेणे गरजेचे आहे. सातत्य : ब्स एका रात्रीत बनत नाहीत. यासाठी रोज किमान १५-२० मिनिटे व्यायाम करणे आणि सातत्य राखणे गरजेचे आहे.आहाराच्या सविस्तर नियोजनासाठी या पेजला भेट द्या. व्यायामाच्या योग्य पद्धतींसाठी चशपीदझ वरील मराठी माहिती वाचा.





# दडपशाहीला उत्तर कोण देणार?




क्रिप्टो व्यवहार, दुर्मिळ खनिजे, नैसर्गिक वायू या संदर्भात ट्रम्प यांचे हितसंबंध बलुचिस्तानात गुंतले आहेत; पण चीनला जेरीस आणणारे बलुची बंडखोर अमेरिकेपुढे झुकण्याची शक्यता नाही.

इराण - अमेरिका युद्धामुळे गेल्या काही कालावधीत पाकिस्तानातील असंतोष जगासमोर तीव्रतेने आला नव्हता. तेथील अंतर्गत बंडाळीपेक्षा आखाती युद्धातील पाकिस्तानची कथित मध्यस्थाची भूमिका चर्चेचा विषय झाली; पण पाकिस्तान अस्वस्थ आहे, देशाच्या मोठ्या भूभागावर सरकारचे नियंत्रण उरलेले नाही, हे क्वेट्टामधील घटनेने पुन्हा सिद्ध केले. पाकिस्तानी सैनिकांना लक्ष्य करण्यासाठी बलुचिस्तानात रेल्वेवर आत्मघातकी हल्ला करण्यात आला. शाहबाज शरिफ यांचे सरकार आणि या सरकारचे पडद्यामागील प्रमुख असीम मुनीर आपल्याच सैनिकांना स्वत:च्या देशात सुरक्षित ठेवू शकत नाहीत! या दोघांसह पाकिस्तानच्या आधीच्या शासकांनी बलुचिस्तानचे शोषण केले, बलुची समाजाच्या हत्याकांडांचे सत्र सुरू ठेवले. त्याची परिणती म्हणजे संपूर्ण पाकिस्तान असुरक्षितेच्या गर्तेत लोटला गेला आहे. बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने ताज्या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. बहुसंख्येने पाकिस्तानी सैनिक असलेली ही रेल्वे क्वेट्टा कँटोन्मेंटकडून निघाली असताना आत्मघातकी हल्ला झाला. याआधी बलुची बंडखोरांनी जाफर एक्स्प्रेसचे अपहरण केले होते. प्रवाशांमध्ये सैनिकांची कायमच मोठी संख्या असलेल्या जाफर एक्स्प्रेसवर अनेकदा बलुची बंडखोरांकडून हल्ले झाले आहेत. क्वेट्टामधील घटनेकडे दडपशाहीला मिळा-लेले उत्तर, म्हणूनच पाहावे लागेल. अस्वस्थ बलुचिस्तान जेथे सरकार आपल्याच नागरिकांना शत्रू मानते तेथे एकात्मता, राष्ट्रनिर्मिती या संकल्पना प्रत्यक्षात येणे अशक्यप्राय असते याचा पाकिस्तानला विसर पडला. भारत आणि अफगाणिस्तान या दोन्ही शेजारी देशांचे शत्रुत्व पाकिस्तानने ओढवून घेतल्याने दोन्ही सीमांवर त्याने तैनात केलेल्या सैनिकांची संख्या मोठी असते. या खा-लोखाल सर्वाधिक संख्येने सैनिक कोठे असतील तर ते बलुचिस्तानात! केवळ लष्करी बळाच्या आधारावर हा समृद्ध प्रांत पाकिस्तानने कसाबसा टिकवून ठेवला आहे. अस्वस्थ बलुचिस्तान ही पाकिस्तानसाठी भळभळणारी जखम होय. सर्व प्रांतातील नागरिक समान, हे साधे तत्त्व जरी पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांना पाळता आले असते तरी त्या देशाची फाळणी टळली असती! तेव्हाच्या पूर्व पाकिस्तानमधील बंगाली भाषकांवर झालेल्या अत्याचारांची तुलना हिटलरने ज्यू धर्मीयांच्या केलेल्या शिरकाणाबरोबरच होऊ शकते. बलुची नागरिकांना समान अधिकार हवा होता. पूर्व पाकिस्तान वेगळा झाल्यावर किमान शहाणपण येऊन पाकिस्तानात सिंधी भाषक आणि बलुची यांना त्यांच्या हक्काचे स्थान मिळणे स्वाभाविक ठरले असते; पण इतिहासापासून धडा घेण्याची त्या देशाची कधीही मानसिकता नव्हती. उलट, खोटा इतिहास अभिमानाने मिरवण्यात तो धन्यता मानतो. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताने नामुष्कीची वेळ आणली तरी लष्करप्रमुखाला त्याचे काही वाटत नाही, यातच सारे आले! नैसर्गिक संसाधनांवर असलेला स्थानिक समुदायांचा हक्क नाकारणे असंतोषाला मुख्य कारण ठरते. बलुचिस्तानात तेच घडले. या साधनांचा वापर पंजाब प्रांतासाठी झाला. आणखी कर्मदरिद्रीपणा म्हणजे आपल्याच नागरिकांना डावलून परकीयांना नैसर्गिक साधनसामग्रीचा अधिकार देणे! चीनला बलुचिस्तानच्या ग्वादर बंदरापर्यंत प्रवेश देणारा आर्थिक महामार्ग, हे त्याचे उदाहरण. अर्थात, स्वाभिमानी बलुची नागरिकांना ते मान्य नाही. आज स्थिती अशी आहे, की बलुची बंडखोरांच्या तीव्र प्रतिकारामुळे चीनचे पाकिस्तानमध्ये कार्यरत असलेले अभियंते, तंत्रज्ञ यांना परिणामकारकरीत्या रोखले गेले आहे. आर्थिक महामार्ग हे चीनसाठी दुःस्वप्न ठरण्याच्या बेतात आहे. चीनकडून आर्थिक हित साधून झाल्याने आपण केलेले करार, दिलेला शब्द याची पाकिस्तानला फिकीर नाही. ट्रम्प आणि अमेरिका त्यांच्यासाठी नवा 'चीन' आहे. दुर्मिळ खनिजांच्या पुरवठा साखळीवर चीनचे असलेले वर्चस्व कमी करण्यासाठी अमेरिकेला पाकिस्तानची मदत हवी आहे. मात्र; बलुची नागरिक अमेरिकेचा घाला पडू देतील, अशी शक्यता नाही. दडपशाहीने आणि बंदुकीच्या जोरावर असंतोष संपत नाही, हे बलुचिस्तानच्या निमित्ताने पाकिस्तानला पुन्हा समजेल आणि त्यासाठी फार प्रतीक्षा करावी लागणार नाही, अशी चिन्हे आहेत.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



अल्कोहोलच्या अतिसेवनामुळे पुरूष आणि स्त्री या कालांतराने ही समस्या गंभीर होऊन त्यामुळे वंधत्वाची तक्रार पुढे येऊ शकते. त्यामुळे अल्कोहोलपासून दूर राहणंच योग्य राहील असं म्हटलं जातं. संशोधनानुसार, लैंगिक ताठरतेच्या समस्या रोखण्यासाठी फ्लॅव्होनाईट्स सेवन करणं आवश्यक आहे. अभ्यासानुसार ब्ल्यूबेरीमध्ये आढळणारं ॲन्थोसायनिन हे एक प्रकारचं फ्लॅव्होनाईड आहे.तसंच इतर लिंबूवर्गीय फळांमध्ये ते आढळून येतं. फळांच्या सेवनामुळे लैंगिक समस्येत १४ टक्क्यांपर्यंत सुधारणा होऊ शकते.

## २ Joke — विनोद




शिक्षक विद्यार्थ्यांना विचारतात, मला सांग, आई श्रेष्ठ की शिक्षक?
शिक्षक !
कारण आई एका वेळेस एकाच मुलाला झोपवते तर शिक्षक नीरस शिकवताना सर्व वर्गाला झोपवतात.

## ३ Message — संदेश



" 4 U "
Aesi Hawa Chali K Hum
BARBAD Ho Gaye..
Gaur Farmaye Ga..
Aesi Hawa Chali K Hum
Barbad Ho Gaye..
Kal K Tum Ladke Aaj
Badmash Ho Gaye.

## ४ Thought — सुविचार



स्कृतज्ञ असावे पण कृतघ्न नसावे.

**संस्कृत सुभाषित**

**जीवन्तोऽपि मृता: पञ्च व्यासेन परिकीर्तिता: ।**
**दरिद्रो, व्याधितो, मूर्ख:, प्रवासी नित्यसेवक: ।।**

अर्थ : दरिद्री, रोगी, मूर्ख, प्रवासी आणि वेठबिगार कामगार हे पाचजण जिवंत असून मेल्यासारखे आहेत अशी व्यासोक्ती आहे.

# मनोरंजक महाशब्दकोडे

### आडवे शब्द


१. जबरदस्तीची हप्तावसुली
४. उगीच
७. खाळगी, मोठे भोक
९.श्वास, धमकी
१०. अधिक महिना
११. नंतर
१२. शिल्लक राहिलेला कचरा
१३. दया करणारा (परमेश्वर)
१४. जीभ
१५. हत्तीसारख्या डौलदार चालीची
१७. त्रस्त
१९. हळूच
२१. गर्दीची धावाधाव
२३. सूट
२४. हेकट
२५. द्रव्य
२६. अभिनेता
२७. नस्काराचा एक शब्द
३०. पांढरपेशा, नोकरदार
३३. संताप, क्रोध
३४. डोक्यावर दहाचा आकडा मिरवणारा
३५. अंधार
३६. बर्फ
३८. पळसाचा डिंक
३९. महाभारतकाळापासून प्रसिद्ध बर्फाळ पर्वतराजी
४१. देवाण-घेवाण
४३. अरण्य
४५. चांदी
४७. मच्छर, चिलट
५०. भान, समज
५१. नाकारणे
५३. नमनीय
५६. गवगवा
५८. गरजू
६०. रथावर बसलेला
६१. हुक्की, लहर
६२. गर्दीचा विळखा
६३. उन्हाळ्यात दिलासा देणारा पाऊस
६४. हिंदीत सरसरीत मिश्रण
६५. दया
६८. डोळे असणारे फळ
७०. दरवळ
७३. कमी केलेला
७४. उत्तराधिकारी
७५. उमाळा
७६. उडाणटप्पू

### उभे शब्द

१. संरक्षणासाठी खोदलेला चर
२. शंकराजवळचे छोटे चर्मवाद्य
३. कपड्याला लावलेली चुणीदार पट्टी
४. विसराळू
५. इच्छा
६. उबदार पांघरुण (इंग्रेजी)
७. बारीक खड्डा
८. विद्युल्लता
१०. मध
१२. हलव्याचा कंद
१५. गणपतीचे एक नाव
१६. हिंदीत भेसळ
१८. नातेवाईक
१९. अपहार, पैशाचा घोटाळा
२०. मोगऱ्याची माळ
२१. निष्णात
२२. वेतन
२३. घोंगड्या विणणारी जमात
२५. मालक
२८. माझे
२९. थोरवी
३१. खण
३२. माणूस
३३. कौसल्यापुत्र
३४. घाणेरडे पाणी
३७. जखमेवरील स्निग्ध औषध
३८. मिठी
३९. फायदेशीर, कल्याणकारी
४०. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री (नाव)
४२. शेंडीभोवती राखलेले केस
४४. एक लहान गड्डाभाजी
४६. आपले राष्ट्रगीत
४८. रेशमी धोतर
४९. शिक्षा
५०. जाण्याची आज्ञा, मात्र हिंदी गाण्यात असल्यास लाडिकपणे होणारी
५२. मातीचा कण
५४. पाणी
५५. योग्य, समर्पक
५६. ओझे वाहणारे जनावर
५७. उन्हाळ्यात केले जाणारे साठवणीचे पदार्थ
५९. यंत्रातील घर्षण कमी करणारे तेल
६४. चिक्कूसाठी प्रसिद्ध गाव
६५. वाळवी
६६. मेख, रहस्य, मर्म
६७. पत्नी
६८. शेवट, अखेर
६९. नूतन
७०. राहण्याची जागा
७१. झीज, मडके
७२. रोखलेली नजर
७४. जागृत, ठिकाण

### आडवे उत्तर

१.खंडणी ४.विनाकारण ७.खबदाड
९.दम १०.मलमास ११.मग १२.गाळ
१३.करुणाकर १४.रसना १५.गजगामिनी
१७.बेजार १९.अलगद २१.पळापळ
२३.सवलत २४.हट्टी २५.धन २६.नट
२७.रामराम ३०.चाकरमानी ३३.राग
३४.नाग ३५.तम ३६.हिम ३८.कमरकस
३९.हिमालय ४१.देवघेव ४३.वन ४५.रजत
४७.मशक ५०.जाणीव ५१.नकार
५३.वंदनीय ५६.गाजावाजा ५८.गरजवंत
६०.रथारूढ ६१.सणक
६२.गराडा ६३.वळीव ६४.घोल



६५.अननस ६८. अननस ७०.घमघमाट
७३.वजा ७४.वारसदार ७५.कढ
७६.उंडगा

### उभे उत्तर

१.खंदक २.डमरु ३.झालर ४.विसरभोळा
५.कामना ६.राग ७.खळगा ८.दामिनी
१०.मकरंद १२.गाजर १५.गजानन
१६.मिलावट १८.नातलाग १९.अफरातफर
२०.गजरा २१.पट्टीचा २२.पगार
२३.सनगर २५.धनी २८.मम २९.महिमा
३१.कप्पा ३२.मानव ३३.राम ३४.नास-वणी ३७.मलम ३८.कव ३९.हितकारक
४०.यशवंतराव ४२.घेरा ४४.नवलकोल
४६.जनगणमन ४८.कद ४९.सजा ५०.राजा
५२.रज ५४.नीर ५५.यथार्थ ५६.गाढव
५७.वाळवण ५९.वंगण ६४.घोलवड
६५.कसर ६६.गोम ६७.भामा ६८.अस्त
६९.नवा ७०.घर ७१.घट ७२.टक ७४.जागा



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### ३५ वर्षांच्या स्टार गोलंदाजाने आयपीएल मधून घेतली निवृत्ती?

मुंबई –तामिळनाडूचा लेग स्पिनर आणि मुंबई इंडियन्स सह पाच आयपीएल संघांचा भाग राहिलेला ३५ वर्षांचा मुरुगन अश्विन याने निवृत्ती जाहिर केली आहे. मुरुगन अश्विनने सोमवार २५ मे रोजी निवृत्ती जाहीर केली असून या गोलंदाजाने तामिळनाडूसाठी ७ फर्स्ट क्लास सामने, ३४ लिस्ट ए सामन्यात भाग घेतला होता. मुरुगन टी२० चा एक स्पेशलिस्ट गोलंदाज होता. म्हणून त्याने आपल्या करिअरमध्ये एकूण ११७ टी२० सामने खेळले, ज्यात त्याने ११७ विकेट घेतल्या. मुरुगन अश्विनला २०१६ मध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर तेव्हा लोकप्रियता मिळाली जेव्हा त्याने आयपीएलमध्ये जबरदस्त पदार्पण केलं. रायजिंग पुणे सुपर जाएंट्सने या गोलंदाजाला ४.५ कोटींना खरेदी केलं.  कोण आहे मुरुगन अश्विन? मुरुगन अश्विननेच्या वडिलांचं नाव एरा मुरुगन आहे आणि ते तामिळ लेखक आणि स्क्रिप्ट राइटर आहेत.

### श्रेयस अय्यरच्या बहिणीचा संताप; अील मेसेज करत सर्व मर्यादा ओलांडल्या

मुंबई–पंजाब किंग्स आयपीएल २०२६ मधून बाहेर पडल्यानंतर कर्णधार श्रेयस अय्यरची बहीण श्रेष्ठा अय्यर सोशल मीडियावर जोरदार ट्रोल होत आहे. अखेर या संपूर्ण वादावर श्रेष्ठाने मौन सोडल आहे. श्रेष्ठाने सोशल मिडीयवर प्रतिक्रिया देत ट्रोलर्सवर संताप व्यक्त केला आहे. श्रेष्ठा अय्यरने सांगितले की, तिने बनवलेला व्हिडीओ हा केवळ मजेशीर होता, कोणत्याही संघाचा किंवा खेळाडूचा अपमान करण्याचा हेतू नव्हता. मी फक्त माझ्या भावाच्या संघाला पाठिंबा देत होते. याचा अर्थ असा नाही की मी इतर संघांशी ईर्ष्या करते, असे ती म्हणाली. मात्र या व्हिडीओनंतर काही लोकांनी तिला सोशल मीडियावर अील मेसेज पाठवण्यास सुरुवात केली. इतकेच नाही तर तिच्या कामाच्या ठिकाणी फोन करूनही अपमानास्पद भाषा वापरण्यात आली असा दावा तिने केला. प्रत्येक गोष्टीला मर्यादा असते आणि काही लोकांनी त्या सर्व मर्यादा ओलांडल्या.

### भारतीय थलेटिक्सला नवी दिशा!

पुणे : भारतीय थलेटिक्समध्ये गेल्या काही वर्षांत लक्षणीय बदल दिसून येत असून विशेषत: ‘ट्रॅक अँड फील्ड’ प्रकारात भारतीय खेळाडूंचा वेग, सातत्य आणि आत्मविश्वास यामध्ये मोठी वाढ झाली आहे. अलीकडे झालेल्या फेडरेशन चषक स्पर्धेत ही प्रगती स्पष्टपणे दिसून आली. १०० मीटर शर्यतीत गुरिंदरवीर सिंग आणि अनिमेष कुजूर यांच्यातील चुरशीमुळे भारतीय धाव–पटू आता जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यास तयार होत असल्याचे संकेत मिळाले. या स्पर्धेत अवघ्या २४ तासांत १०० मीटरचा राष्ट्रीय विक्रम तीन वेळा मोडला गेला. चारशे मीटरमध्ये विशा–लने ४५ सेकंदांच्या आत शर्यत पूर्ण करत नवा इतिहास रचला. हेप्टॅथलॉनमध्ये तेजस्विन शंकरने आठ हजार गुणांचा टप्पा गाठला, तर उंच उडीत महाराष्ट्राच्या सर्वेश कुशारेने उल्लेखनीय कामगिरी केली. अडथळा शर्यतीत तेजस शिरसे चमकला, तर हातोडाफेकमध्ये मनप्रीत कौरने प्रभाव पाडला, तर गोळाफेकमध्ये समरदीप सिंग गिल याने तेंजिदरपाल सिंग तूर याच्यासमोर आव्हान उपस्थित केले.

### विराटसोबतच्या राड्यानंतर हेडची पत्नी संतापली

मुंबई–आयपीएल २०२६ मध्ये सनरायजर्स हैदराबाद आणि आरसीबी यांच्यात २२ मे रोजी झालेल्या सामन्यात ट्रॅविस हेड आणि विकाट कोहली यांच्यात मैदानावर बाचाबाची झाली. या घटनेनंतर ट्रॅविस हेडच्या पत्नीवर सोशल मीडियावर आक्षेपार्ह टीका करण्यात आली. ट्रोलर्सनी हेडच्या पत्न–ीला टार्गेट करताना मर्यादा ओलांडल्या. यानंतर हेडची पत्नी जेसिकाने यावर प्रतिक्रिया दिली आहे.मकोहलीसोबत ट्रॅविस हेडचे मैदानात वाद झाले, त्यानंतर मला सोशल मीडियावर पुन्हा एकदा अपमानास्पद मेसेज आणि ट्रोलिंगचा सामना करावा लागत आहे.

# आरसीबीची अंतिम फेरीत धडक!

## गुजरातवर मिळवला दणदणीत विजय; पॉवरप्ले ठरला सामन्याचा टर्निंग पॉईंट

नवी दिल्ली: आरसीबीने पहिल्या क्वालिफायर सामन्यात गुजरात टायटन्सविरूद्ध दणदणीत विजय मिळवत आयपीएल २०२६च्या फायनलमध्ये धडक मारली आहे.

ठउइ ंी ऋढ र्टीरश्रळषळशी–१ चरींलह कळसहश्रळसहीीं: आयपीएल २०२६च्या अंतिम सामन्याचा पहिला संघ ठरला. पहिल्या क्वालिफायर सामन्यात आरसीबीने गुजरात टायटन्सवर दणदणीत विजय मिळवत अंतिम सामन्यात धडक मारली. आरसीबीने गुजरातचा ९२ धावांनी पराभव केला. आरसीबीने सांघिक कामगिरीच्या बळावर हा शानदार विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने २५४ धावांचा डोंगर उभारला. ही धावसंख्या आयपीएल प्लेऑफ इतिहासातील आजवरची सर्वात मोठी धावसंख्या होती. तर पराभूत झालेला संघ गुजरात टायटन्स २९ मे रोजी दुसरा क्वालिफायर सामना खेळणार आहे.

आरसीबीला प्रथम फलंदाजीसाठी पा–चारण केल्यानंतर गुजरातचे गोलंदाज व फिल्डिंगमधील काही चुकांमुळे गुजरा–तचा संघ मागे पडला. रजत पाटीदार दोन वेळा जीवदान मिळाल्यानंतर त्याने



मागे वळून पाहिलं नाही आणि नाबाद ९३ धावांची वादळी खेळी साकारली. यासह आरसीबीने प्रथम फलंदाजी २५४ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात चांगली सुरूवात केल्यानंतर गुजरा–तचा डाव मात्र पत्त्यांसारखा कोसळला. गुजरातने पॉवरप्लेमध्येच ५ विकेट्स गम ावल्या आणि इथेच सामना आरसीबीने आपल्या बाजूने फिरवला.

आरसीबीने दिलेल्या २५५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरा–तने पहिल्या षटकात चौकारांच्या फटकेबाजीसह सुरूवात केली. पण यानंतर मात्र संघाचा डाव पत्त्यांसारखा कोसळला. गुजरातने पॉवरप्लेमध्ये ५ विकेट्स गमावल्या आणि आरसीबीने इथेच सामना आपल्या बाजूने वळवला होता. साई सुदर्शन १४ धावांवर हिट विकेटमुळे बाद झाला. तर भुवनेश्वर कुमारने २ धावांवर शुबमन गिलला तर जोश हेझलवूडने बटलरला २९ धावांवर क्लीन बोल्ड केलं. तर रसिख सलामने सहावं षटक डबल विकेट्स मेडन टाकत गुजरातला मोठे धक्के दिले. रसिखने या षटकात निशांत सिंधु व जेसन होल्डरला बाद केलं. यानंतर वॉशिंग्टन सुंदर ८ धावा, रशीद खान ८ धावा तर कगिसो रबाडा ९ धावांवर बाद झाले. तर गुजरातकडून राहुल तेवतियाने एकट्याने कडवी झुंज दिली. राहुल तेवतिया ४३ चेंडूत ८ चौकार व ४ षटकारांसह ६८ धावा करत बाद झाला. आरसीबीकडून जेबक डफफीने ३ विकेट्स, तर रसिख सलामने व भुवनेश्वर कुमार यांनी प्रत्येकी २ विकेट्स हेझलवूड, कृणाल पंड्या यांनी प्रत्येकी १–१ विकेट्स घेतल्या.

तत्पूर्वी गुजरातने नाणेफेक जिंकत आरसीबीला प्रथम फलंदाजीसाठी पा–चारण केलं. वेंकटेश अय्यर व विराट कोहलीची जोडी फलंदाजीसाठी उतरली. वेंकटेश १९ धावा करत झेलबाद झाला. त्यानंतर विराट कोहली व देवदत्त पडिक्कल यांनी दुसऱ्या विकेटसाठी ३८ चेंडूत ७२ धावांची खेळी केली. विराट २५ चेंडूत ४३ धावा तर देवदत्त पडिक्कल ३० धावा करत बाद झाले. यानंतर रजत पाटीदार व कृणाल पंड्या यांनी संघाचा डाव सावरला. दोघांनी ४५ चेंडूत ९५ धावांची खेळी केली.

## वावरिंका–मॉनफिल्सलाही थेट प्रवेश, अखेरची स्पर्धा खेळण्यास सज्ज...

दिल्ली–फ्रेंच ओपन २०२६ स्पर्धेसाठी भारतीय वंशाचा अमेरिकन टेनिसपटू निशेष बसवरेड्डी याला वाइल्ड कार्ड एंट्री मिळाली आहे. आयोजकांनी सोमवारी याची अधिकृत घोषणा केली आहे. फ्रेंच ओपेन २०२६ २४ मे पासून सुरु झाली आहे. निशेष बसवरेड्डीसोबत तीन वेळा ग्रँडस्लॅम विजेता स्टॅन वावरिंका आणि फ्रान्सचा स्टार खेळाडू गेल मॉनफिल्स यांनाही थेट मुख्य फेरीत स्थान देण्यात आले आहे. वावरिंका आणि मॉनफिल्स हे दोघेही आपल्या करियरच्या अखेरच्या टप्प्यात आहे, हा त्यांचा शेवटचा फ्रेंच ओपन ठरण्याची शक्यता मानली जात आहे. ४१ वर्षीय वावरिंक आणि ३९ वर्षीय मॉनफिल्स या दोंघेही या स्पर्धेनंतर व्यावसायिक टेनिसमधून निवृत्ती घेऊ शकतात. वावरिंकाने २०१५ मध्ये नोव्हाक जोकोविचला अंतिम फेरीत हरवले होते.स्वित्झर्लंडच्या स्टॅन वावरिंकाने २०१५ मध्ये रोलाँ गॅरोचे विजेतपद पटकावले होते. सध्या तो एटीपी क्रमवारीत ही पुरुषांच्या व्यावसायिक टेनिस खेळाडूंची जागतिक पा–तळीवरील गुणवत्तेनुसार लावलेली क्रमवारी आहे.) १२५ व्या स्थानावर आहे. तर गेल मॉनफिल्सने २००८ मध्ये फ्रेंच ओपनच्या उपांत्य फेरीत धडक मारली होती. आयोजकांकडून या दोन्ही दिग्गजांचा विशेष सत्कारही करण्यात येणार आहे. फ्रान्सचे गेल मॉनफिल्स २००८ मध्ये पॅरिसमध्ये उपांत्य फेरीपर्यंत पोहोचले होते. २१ वर्षीय निशेष बसवरेड्डीचे पालक मूळचे आंध्र प्रदेशातील नेल्लोरचा आहे. त्याचे वडील मुरलीकृष्ण बसवरेड्डी आणि आई साई प्रसन्ना १९९९ मध्ये अमेरिकेत स्थायिक झाले होते.

## सूर्यकुमार यादवचे रहस्यमय ट्विट!, नविन प्रवासाला सुरवात

मुंबई–टी६० लाईफ भारताच्या टी २० संघाचा यशस्वी कर्णधार आणि 'मिस्टर ३६०' सूर्यकुम ार यादव यांनी आज एक रहस्यमय ट्विट केलंय. या ट्विटमुळं क्रिकेट जगतात चर्चे ला उधान आलं आहे. आयपीएल हंगाम सुरू असतानाच त्यांनी हे ट्विट केलं, ''मित्रांनो, मी आता एका अधिक मोठ्या प्रवासाला निघ–ालो आहे. जीवनाच्या नव्या अध्यायात पाऊल टाकत आहे. वेगळ्या गतीनं. यालाच म्हण–तात ऊ६०थ्षा, असं त्यांनी ट्विटमध्ये म्हटलं आहे. या ट्विटनंतर सूर्यकुमार यांच्या लाखो चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. सोशल मीडियावर ट्विट व्हायरल झालं असून, कमेंट्समध्ये ''स्काय कुठे निघाले?'', ''नवीन निर्णय काय आहे?'' असे प्रश्न विच–ारले जात आहेत.

नव्या जीवनप्रवासाची सुरुवात : सूर्यकुमार यादव हे केवळ आक्रमक फलंदाज आणि यशस्वी कर्णधार म्हणूनच नव्हे, तर भारतीय क्रिकेटचे एक महत्त्वाचे आधार स्तंभ आ–हेत. २०२६ टी–२० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाचे नेतृत्व त्यांनी केलंय. मुंबई इंडियन्ससाठीही ते अत्यंत महत्त्वाचे खेळा–डू आहेत. अशा व्यस्त आयुष्यात अचानक आलेलं हे ट्विट चाहत्यांसाठी आश्चर्यकारक ठरलं आहे. दरम्यान, सूर्यकुमार यादव आणि त्यांच्या पत्नी देविशा यांच्या घरात 'लक्ष्मी' या नाव–ाची नवजात कन्या आली असल्याची आनंददायी बातमीही समोर आली आहे. अनेक क्रिकेटप्रेमी आणि सेलिब्रिटींनी या आनंदात सहभागी होत जोडप्याला शुभेच्छा दिल्या आहेत. अनेकांचा अंदाज आहे की, ऊ६०थ्षा हे ट्विट नव्या पितृत्वाच्या आनंदाशी आणि व्यक्तिगत जीवना–तील नव्या टप्प्याशी संबंधित असावं.सूर्यकुमार यादव हे आपल्या ३६० डिग्री फलंदाजीशैलीसाठी प्रसिद्ध आहेत. आयपीएल आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये त्यांनी अनेक विक्रम नोंदवले आ–हेत. मात्र, या ट्विटमुळं आता क्रिकेटपलीकडील त्यांच्या जीवना–तील नव्या अध्यायाकडे सर्वांचं लक्ष वळलं आहे. सूर्यकुमार यांच्या या घोषणेमुळं क्रिकेट विश्वात देखील चर्चा रंगली असून, त्यांच्या भविष्यातील निर्णयांवर सर्वांचं लक्ष केंद्रित झालं आहे. ऊ६०थ्षा हा हॅशटॅग ट्रेंडिंग झाला असून, यामागील खरा अर्थ काय आहे, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.







## अर्शदीप सिंगचा धक्कादायक निर्णय! इन्स्टावरील २०० पोस्ट डिलीट

विराट सोबतचा खास क्षणही गायब, नेमकं काय लपवत आहे स्टार गोलंदाज?

मुंबई–भारतीय संघ आणि पंजाब किंग्सचा डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग सध्या मैदानावरील कामगिरीपेक्षा सोशल मीडियावरील वादांमुळेच जास्त चर्चेत आला आहे. मुंबई इंडियन्सचा फलंदाज तिलक वर्मावर केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्यापासून ते चाहत्यांसोबतच्या ऑनलाइन वादापर्यंत, गेल्या काही आठवड्यांत अर्शदीप सतत ट्रोलर्सच्या निशाण्यावर राहिला आहे.

या सततच्या टीका आणि वादांच्या पार्श्वभूमीवर अर्शदीप सिंगने मोठं पाऊल उचललं आहे. त्याने आपल्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवरील २०० हून अधिक पोस्ट डिलीट किंवा आर्काइव्ह केल्या आहेत. विशेष म्हणजे, यात टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहली सोबतच्या २०२५ चॅम्पियन्स ट्रॉफीतील त्याचा प्रचंड व्हायरल झालेला रील व्हिडिओदेखील गायब झाला आहे.

अर्शदीपच्या या कृतीमुळे सोशल मीडियावर मोठी चर्चा रंगली आहे. काही दिवसांपूर्वी त्याच्या अकाउंटवर शेकडो पोस्ट होत्या, पण आता फक्त ४४ पोस्ट दिसत आहेत. साधारणपणे सेलिब्रिटी ब्रँड मेकओव्हर किंवा वादानंतर सोशल मीडिया क्लीन करतात, मात्र अर्शदीपच्या बाबतीत हे अलीकडच्या ट्रोलिंगशी जोडून पाहिलं जात आहे. विशेष म्हणजे, या निर्णयावर ना अर्शदीपने ना त्याच्या पीआर टीमने कोणतंही अधिकृत स्पष्टीकरण दिलेलं नाही.

नेमका काय होता तिलक वर्मा वाद?

या महिन्याच्या सुरुवातीला अर्शदीपने भारतीय खेळाडूंमधील हलक्याफुलक्या मजेशीर क्षणांचा एक व्हिडिओ शेअर केला होता. मात्र, त्या व्हिडिओतील काही शब्दांमुळे मोठा वाद निर्माण झाला. व्हिडिओम ध्ये अर्शदीपने तिलक वर्माला मजेत अंधेरा असं म्हटलं होतं. त्याने तिलकला सनस्क्रीन लावली का?''असाही सवाल केला होता. त्यानंतर नमन धीरकडे बोट दाखवत त्याला ''पंजाबचा खरा ग्लो'' म्हटलं. हा व्हिडिओ व्हायरल होताच सोशल मीडियावर संतापाची लाट उसळली. अनेकांनी अर्शदीपवर रंगभेदाला प्रोत्साहन दिल्याचा आरोप केला आणि त्याला जोरदार ट्रोल केलं. मात्र या संपूर्ण प्रकरणावर अर्शदीप आणि तिलक वर्मा दोघांनीही अद्याप मौन बाळगलं आहे. पंजाब किंग्सकडून खेळताना अर्शदीपसाठी आयपीएल २०२६ हंगाम संमिश्र आणि महागडा ठरला. १४ सामन्यांत १४ विकेट घेत तो संघाचा सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज ठरला, पण त्याची इकॉनॉमी तब्बल १०.२० इतकी खराब राहिली. अनेक सामन्यांत त्याची लाईन–लेंथ बिघडलेली दिसली आणि डेथ ओव्हर्समध्ये त्याने भरपूर धावा दिल्या. मागील हंगामात उपविजेतेपद पटकावणाऱ्या पंजाब किंग्सने यंदा सुरुवातीच्या ७ पैकी ६ सामने जिंकूनही अखेरीस अवघ्या १ गुणाने प्लेऑफची संधी गमावली. त्यामुळे संघासोबतच अर्शदीपवरही मोठा दबाव निर्माण झाला आहे.

## लिलावात कुणी विचारलेच नाही; ज्याच्या नावावर प्लेऑफमध्ये सर्वाधिक धावा, कोण आहे तो खेळाडू?

दिल्ली–आयपीएल २०२६ च्या लीग फेरीतील सामने संपले असून आता २६ मेपासून प्लेऑफला सुरुवात होत आहे. पहिल्या क्वालिफायरमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळूरू आणि गुजरात टायटन्स यांच्यात हायव्होल्टेज लढत रंगणार आहे. या सामन्याकडे संपूर्ण क्रिकेटविश्वाचे लक्ष लागले आहे. पण तुम्हाला माहिती आहे का, आयपीएलच्या इतिहासात प्लेऑफमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज कोण आहे? जर तुमच्या मनात विराट कोहली किंवा एम एस धोनी यांचे नाव आले असेल, तर तुम्ही चुकत आहात. चला तर मग जाणून घेऊया, आयपीएल प्लेऑफमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज नेमका कोण आहे.

आयपीएल प्लेऑफमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज कोण?

आयपीएल प्लेऑफमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम सुरेश रैना यांच्या नावावर आहे. 'मिस्टर आयपीएल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रैनाने आयपीएलच्या इतिहासात २४ प्लेऑफ सामने खेळले असून त्यात १५५.२१ च्या स्ट्राइक रेटने आणि ३७.५७ च्या सरासरीने तब्बल ७१४ धावा केल्या आहेत. या काळात त्याने ७ अर्धशतकं झळकावली. रैनाच्या बॅटमधून ५१ चौकार आणि ४० षटकार पाहायला मिळाले. रैना आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्स आणि गुजरात लायन्स या दोन संघांकडून खेळला. त्याच्या संघांनी तब्बल ११ वेळा प्लेऑफसाठी पात्रता मिळवली होती.

सुरेश रैनाने किती वेळा आयपीएल फायनल खेळली?

### मिस्टर आयपीएल

सुरेश रैनाने आपल्या आयपीएल कारकिर्दीत चार वेळा अंतिम सामना खेळला आणि विशेष म्हणजे चारही वेळा विजेतेपद पटकावले.

चारही फायनलमध्ये तो चेन्नई सुपर किंग्सचा भाग होता.

२०१० मध्ये सीएसकेने मुंबई इंडियन्सला हरवत ट्रॉफी जिंकली.

२०११ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळूरूवर मात केली.



२०१८ मध्ये सनरायझर्स हैदराबादला हरवले.

२०२१ मध्ये कोलकाता नाइट रायडर्सवर विजय मिळवत जेतेपद पटकावले.

सुरेश रैनाचे आयपीएल रेकॉर्ड

रैनाने २००८ मध्ये चेन्नई सुपर किंग्सकडून आयपीएलमध्ये पदार्पण केले. सीएसके स्पर्धेत असताना तो कायम त्या संघाचाच भाग राहिला. मात्र २०१६ आणि २०१७ मध्ये सीएसकेवर बंदी आल्याने तो गुजरात लायन्सकडे गेला होता. रैनाने आयपीएलमध्ये २०५ सामने खेळले असून १३६.७६ च्या स्ट्राइक रेटने आणि ३२.५२ च्या सरासरीने ५५२८ धावा केल्या. त्याच्या नावावर १ शतक आणि ३९ अर्धशतकं आहेत. तसेच त्याने ५०६ चौकार आणि २०३ षटकार ठोकले.

आयपीएल २०२२ मध्ये घेतला निरोप

आयपीएल २०२२ मेगा लिलावात सुरेश रैनाने २ कोटींच्या बेस प्राईससह नाव नोंदवले होते. मात्र कोणत्याही संघाने त्याच्यावर बोली लावली नाही आणि तो अनसोल्ड राहिला. त्यानंतर रैनाने आयपीएलमधून निवृत्ती जाहीर केली.

आयपीएल प्लेऑफमध्ये सर्वाधिक धावा करणारे टॉप–१० फलंदाज

सुरेश रैना – ७१४ धावा
एमएस धोनी – ५२३ धावा
शुभमन गिल – ४७५ धावा
सूर्यकुमार यादव – ४०६ धावा
रोहित शर्मा – ४०५ धावा
विराट कोहली – ३९६ धावा
फाफ डु प्लेसिस – ३९०धावा

## अहमदपूर शहर व परिसरात वाऱ्यासह मुसळधार पावसाने धुमाकूळ

**अहमदपूर/प्रतिनिधी :** अहमदपूर शहर आणि तालुक्यात आज सायंकाळी साडेसातच्या सुमारास हवामानात अचानक भीषण बदल झाला. संपूर्ण आकाश काळ्या ढगांनी माखून गेले आणि काही वेळातच विजेच्या कडकडाटासह व तीव्र वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने धुमाकूळ घातला. गेल्या काही दिवसांपासून असह्य उकाड्याने त्रस्त असलेल्या नागरिकांना या पावसामुळे दिलासा मिळाला असला, तरी या वादळाने तालुक्यात मोठे संकट उभे केले आहे. आं या अवकाळी वादळाचा सर्वाधिक फटका परिसरातील फळबागांना, विशेषतः आंब्याच्या बागांना बसला आहे. काढणीला आलेला आंबा खाली पडल्याने बागायतदार शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी वर्ग पूर्णपणे खचला आहे. वादळाचा तडाखा तीव्र होता की, अनेक ठिकाणी रस्त्यांच्या कडेला असलेला झाडाच्या फांद्या मोडून पडल्या होत्या. अहमदपूर परिसरातील प् वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झालायासोबतच, वादळ आणि पाऊस यामुळे ''लाईट'' गायब झाली आहे. संपूर्ण शहर आणि ग्रामीण भागात अंधाराचे साम्राज्य पसरले. अचानक आलेल्या या अस्मानी संकटामुळे अहमदपूर तालुक्यातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून अचानक आलेल्या पावसामुळे जनजीवन चांगलेच विस्कळीत झाले. रात्री साडेआठ वाजेपर्यंत हा पाऊस सुरु होता. अनेकाच्या घरांवरील पत्रे उडाले गावातील झोपडी वजा घरे असलेल्या घरावरील पत्रे उडून गेली. जवळपास शंभर घरावरील पत्रे उडून गेल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या नैसर्गिक संकटामुळे यामुळे अनेकांचे संसार उघड्यावर आली आहेत या नुकसानीचे पंचनामे करून शासनाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## रेणापूर तालुक्यात जलतारा योजना सक्षमपणे राबविण्याची गरज

**रेणापूर/प्रतिनिधी:** रेणापूर तालुका नेहमीच पाणी टंचाईच्या छायेत राहिला आहे. या वर्षी तीव्र उन्हामुळे तापमानात वाढ झाल्याने यंदाच्या पावसाळ्यावर एल निनो चे सावट येण्याचा धोका निर्माण झाला आहे त्यामुळे पाऊस कमी पडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. आगामी काळात येणाऱ्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी रेणापूर तालुक्यात जलतारा योजना प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे.

तालुक्यात कडक उन्हामुळे पाण्याची भुजल पा-तळी खालावली आहे. विहिरी - बोअरनी तळ गाठला होता ७ तर रेणा व्हटी या प्रकल्पातील जलसाठ्यात मोठी घट होत आहे. पाझर तलाव कोरडे पडत आहेत, धरणातून बॅरेजेस मध्ये सोडलेल्या पाण्याचा वापर शेतीसाठी होत आहे. परिणामी तांडे वाड्यातील सर्वसामान्यांना पाणी टंचाईच्या झळा बसत आहेत.

अशा परिस्थितीत जलतारा योजना अधिक प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे. यामुळे भुजल पातळी वाढून शेतीसाठी पाणी उपलब्ध होईल. तसेच तालुक्यात पडणाऱ्या पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी गावागावात व प्रत्येक शेतकऱ्यांने भूजल पुनर्भरण केले तर येण्याऱ्या संकटावर मात करता येईल. रेणापूर तालुक्यात आजही तांड्या वाड्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटलेला नाही. हनमंतवाडी तांड्यावरील नागरीकांना उन्हाळा असो की पावसाळा नेहमीच पिण्याचे व सांडपाणी विकतच घ्यावे लागते. दरवर्षी तालुक्यातील जनतेला पाणी टंचाईला सामोरे जावे लागते.

हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार एल निनो च्या पावसाचे प्रमाण कमी राहणार असल्याचे सांगीतले जात आहे. पाऊस कमी झाल्यास केवळ पिण्याच्या पाण्याचाच नव्हे तर शेतीच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर होऊ शकतो. त्यामुळे तालुक्यातील अतिशोषीत गावात जुन ते ऑक्टोबर या कालावधीतील पावसाच्या पाण्याचा थेंब न थेंब अडवून तो जमिनीत मुरविण्याचे काम भूजल पुनर्भरणाच्या माध्यमातुन करण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागणार आहेत.

लहान लहान ओढे, नाले, पाणी साठून राहण-ारी ठिकाणांचे प्राधान्याने पुनर्भरण करावे लागणार आहे. शेतकरी व सर्वसामान्यांना आर्थिक भार सोसावा लागू नये म्हणून रोहियो च्या माध्यमातुन अनुदान देणे गरजेचे आहे.

# आमदार अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

## बेलकुंड उपसा सिंचन योजनेसह जलसंपदा विभागाच्या विविध विकासकामांना गती



**औसा/प्रतिनिधी :** २५ मे २०२६ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार मुख्यमंत्री कार्यालयाचे खाजगी सचिव विद्याधर महाले यांनी मंत्रालय, मुंबई येथे जलसंपदा विभागाच्या स्थानिक प्रश्नांसंदर्भात महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली. या बैठकीत लातूर व धाराशिव जिल्ह्यातील अनेक प्रलंबित विकासकामांवर सकारात्मक चर्चा होऊन संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आमदार अभिमन्यू पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अनेक महत्त्वाच्या योजनांना गती मिळाल्याचे स्पष्ट झाले.

बैठकीतील सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे निम्न तेरणा प्रकल्प, माकणी (ता. लोहारा, जि. धाराशिव) येथून औसा तालुक्यातील बेलकुंड येथे प्रस्तावित उपसा सिंचन योजनेस तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. या योजनेसाठी आवश्यक संकल्पना व नकाशे तातडीने तयार करून प्रकल्पाचा प्रशासकीय मान्यता प्रस्ताव ३० जून २०२६ पर्यंत शासनाकडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.या योजनेमुळे बेलकुंडसह परिसरातील तब्बल १५ ते १६ गावांना थेट लाभ मिळणार असून, अनेक वर्षांपासून पाण्याच्या समस्येला तोंड देणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. शेकडो हेक्टर जमीन ओलिताखाली येऊन परिसरात जलक्रांती घडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

तसेच मांजरा नदीवरील नागझरी बॅरेजस्थळी ५० टक्के विश्वासार्हतेने पाणी उपलब्धतेचा प्रस्ताव शासनाकडे यापूर्वीच सादर करण्यात आला असून, या योजनेस त्वरित तत्वतः मान्यता देऊन पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या. या निर्णयामुळे मांजरा नदी परिसरातील पाणी तावरजा प्रकल्पात उपलब्ध करून देण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.तावरजा नदीवरील सेलू को.प. बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रुपांतर करण्याच्या योजनेस त्वरित प्रशासकीय मान्यता देण्याचे निर्देशही देण्यात आले. या कामामुळे परिसरातील जलसाठा क्षमता वाढून शेतीसाठी आवश्यक पाण्याची उपलब्धता अधिक मजबूत होणार आहे.

औसा तालुक्यातील याकतपूर येथील जलसंपदा विभागाची वसाहत तालुका क्रीडा अधिकारी कार्यालयाकडे हस्तांतरित करण्यात आली असून, त्या ठिकाणी आधुनिक क्रीडा संकुल उभारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील युवकांना क्रीडा सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.याचबरोबर लातूर जिल्ह्यातील जलसंपदा विभागाची सर्व विभागीय कार्यालये लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर या कार्यालयाशी जोडण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ, गतिमान आणि समन्वयपूर्ण होण्यास मदत होणार आहे.दरम्यान, निम्न तेरणा प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे जवळपास १ टीएमसी पाणीसाठा कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे. हा साठा पुनर्स्थापित करण्यासाठी प्रकल्पातील गाळ काढण्याची कार्यवाही तातडीने हाती घेण्याच्या सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

बेलकुंड उपसा सिंचन योजनेच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेमध्ये किल्लारी, एकोंडी, किल्लारी राजेगाव, कोकळगाव आदी भागांतील पाण्यात गेलेल्या रस्ते व पुलांच्या कामांचाही समावेश करण्याबाबत सकारात्मक निर्देश देण्यात आले. त्यामुळे स्थानिक नागरिकांच्या दळणवळणाच्या समस्याही मार्गी लागणार आहेत.महाराष्ट्रातील सर्व कालव्यांलगतचे रस्ते 'शेतरस्ता' म्हणून विकसित करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली असून त्यासंदर्भात पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या वाहतुकीच्या सुविधा अधिक सक्षम होणार आहेत.मराठवाडा, विशेषतः लातूर जिल्ह्यातील जलसंपदा प्रकल्पांना गती देण्यासाठी विशेष कार्यकारी कक्ष स्थापन करण्याचाही निर्णय बैठकीत घेण्यात आला. संबंधित प्रकल्प जलदगतीने पूर्ण करण्यासाठी विशेष बैठका घेऊन कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

स्थानिक जनतेच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर मुख्यमंत्री कार्यालयाने सकारात्मक भूमिका घेतल्यामुळे लातूर, औसा आणि परिसरातील विकासकामांना आता निश्चितच वेग मिळणार असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# लोकनेते विलासराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त मांजरा कारखाना येथे अभिवादन; २०९ कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी



**लातूर/प्रतिनिधी:** लोकनेते राज्याचे माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासरावजी देशमुख साहेब यांच्या ८१ व्या जयंतीनिमित्त विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना येथे उभारलेल्या स्मृतीस्थळावर त्यांच्या पवित्र स्मृतींना राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी तथा कारखान्याचे चेअरमन दिलीपराव देशमुख साहेब यांनी अभिवादन केले

या प्रसंगी जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, राज्य साखर संघाचे सदस्य आबासाहेब पाटील,मांजरा कारखान्याचे व्हाइस चेअरमन अशोकराव काळे,रेणा कारखाना चेअरमन अनंतराव देशमुख,संत शिरोमणी कारखान्याचे चेअरमन शाम भोसले, रेणा चे व्हाइस चेअरमन प्रविण पाटील, मांजरा कारखान्याचे माजी व्हा चेअरमन तथा संचालक श्रीशैल्य उटगे, जिल्हा परिषद सदस्य दत्तात्रेय टेकाळे, सचिन दाताळ,बालाजी हाके संभाजी रेड्डी,ऊस विकास समिती अध्यक्ष कैलास पाटील, तात्यासाहेब देशमुख वसंत उफाडे, सदाशिव कदम, मदन भिसे ,धनराज दाताळ ,शंकरराव बोळंगे, निळकंठ बचाटे, नवनाथ काळे ,सचिन शिंदे, ज्ञानेश्वर पवार , बालाजी पांढरे, अनिल दरकसे, दयानंद बिडवे ,भैरू कदम तज्ञ संचालक सुरेश चव्हाण, श्रीकृष्ण काळे , विलास चामले, अरुण कापरे तक्रार निवारण समिती अध्यक्ष तानाजी जाधव, कार्यकारी संचालक पंडित देसाई कामगार प्रतिनिधी शत्रुघ्नपाटील, खाते प्रमुख, अधिकारी, कर्मचारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आरोग्य शिबिरात २०९ कर्मचाऱ्यांची तपासणी**

लोकनेते विलासराव देशमुख यांनी राज्याच्या विकासासाठी दिलेले योगदान, सहकार क्षेत्रातील त्यांची दूरदृष्टी आणि सर्वसामान्यांप्रती असलेली बांधिलकी यांचे यावेळी स्मरण करण्यात आले. जयंतीनिमित्त कारखाना परिसरात कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण २०९ कर्मचाऱ्यांची रक्ततपासणी करून विविध आजारांचे रोगनिदान करण्यात आले. यासाठी डॉ संजय गांधी, डॉ अभिजीत यादव, डॉ अमोल पाटील, डॉ प्रविण साखरे यांचे सहकार्य लाभले. तसेच कर्मचाऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेच्या दृष्टीने मान्यवरांच्या उपस्थितीत कारखाना कर्मचाऱ्यांसाठी रुग्णवाहिका सेवेचाही शुभारंभ करण्यात आला.

या उपक्रमांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत असून, सामाजिक बांधिलकी जपत कारखाना प्रशासनाने आरोग्यविषयक महत्त्वपूर्ण पाऊल उचलल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# रक्तदानातून मानवतेची सेवा हेल्मेटमधून सुरक्षिततेचा संदेश

## वाढवणा व अहमदपूर पोलीस ठाण्यांचा समाजाभिमुख उपक्रम; एकूण २२२ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा पोलीस दलामार्फत सामाजिक बांधिलकी, मानवतेची जाणीव आणि जनजागृतीचा संदेश देणारे विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून पोलीस स्टेशन वाढवणा तसेच अहमदपूर पोलीस ठाणे यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या समाजाभिमुख उपक्रमास नागरिक, युवक, सामाजिक कार्यकर्ते तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

वाढवणा पोलीस स्टेशन येथे आयोजित रक्तदान शिबिरामध्ये १४५ पुरुष व ६ महिला अशा एकूण १५१ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले. तसेच अहमदपूर पोलीस ठाण्याकडून आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरामध्ये ७१ बाटल्या रक्तसंकलन करण्यात आले. अशा प्रकारे दोन्ही उपक्रमांमधून एकूण २२२ रक्तदात्यांचे रक्त संकलित करण्यात आले असून, उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या रक्तटंचाईच्या परिस्थितीत हा उपक्रम अनेक गरजू रुग्णांसाठी जीवनदायी ठरणार आहे.

रक्तदान हेच श्रेष्ठ दान या उदात्त भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये युवकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला. विशेष म्हणजे, रक्तदानासोबतच रस्ते सुरक्षा आणि वाहतूक नियमांविषयी जनजागृती करण्यासाठी अभिनव उपक्रमही राबविण्यात आला. वाढवणा पोलीस स्टेशनकडून रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांना हेल्मेट भेट देण्यात आले. त्यामुळे दुसऱ्याचे जीवन वाचविण्यासाठी रक्तदान आणि स्वतः चे जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी हेल्मेट असा दुहेरी सामाजिक संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचविण्यात आला.

या प्रसंगी मा. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी रक्तदात्यांचे अभिनंदन करत समाजहितासाठी पोलीस दलामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांनीही उपस्थित रक्तदात्यांशी संवाद साधून त्यांच्या सामाजिक योगदानाचे कौतुक केले.सदर उपक्रमांमुळे पोलीस दलाची समाजाभिमुख भूमिका अधोरेखित झाली असून पोलीस व नागरिक यांच्यातील विश्वास आणि समन्वय अधिक दृढ होत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. वाढवणा व अहमदपूर पोलीस ठाण्यांनी राबविलेल्या या उपक्रमांचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, समाजहितासाठी अशा उपक्रमांची नितांत आवश्यकता असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## धुळे ते बाभळगाव पायी पदयात्रा करून हेमंत सूर्यवंशी यांनी वाहिली विलासराव देशमुख यांणा आदरांजली



**लातूर/प्रतिनिधी:** २६ मे २०२६ महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि माजी केंद्रीय मंत्री लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या ८१ व्या जयंतीनिमित्त त्यांच्याप्रती असलेली अथांग श्रद्धा व्यक्त करण्यासाठी धुळे येथील श्री. हेमंत सूर्यवंशी यांनी धुळे ते बाभळगाव (ता. लातूर) अशी शेकडो किलोमीटरची पायी पदयात्रा पूर्ण केली.

मंगळवारी सकाळी बाभळगाव येथील विलासबागेत पोहोचून सूर्यवंशी यांनी लोकनेते विलासरावजी देशमुख यांच्या स्मृतीस्थळी अत्यंत भावपूर्ण वातावरणात अभिवादन केले. श्री. हेमंत सूर्यवंशी यांनी पायी पदयात्रा करून बाभळगाव गाठल्याची माहिती मिळताच, राज्याचे माजी मंत्री तथा आमदार अमित विलासरावजी देशमुख साहेब यांनी सूर्यवंशी यांची बाभळगाव येथील निवासस्थानी प्रत्यक्ष भेट घेतली. आदरणीय साहेबांच्याप्रती सूर्यवंशी यांनी व्यक्त केलेल्या या अनोख्या आणि निस्सीम भावनांचा आदर करत आमदार अमित देशमुख यांनी त्यांचे मनापासून आभार मानले.

या प्रसंगी आमदार अमित देशमुख यांनी हेमंत सूर्यवंशी यांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सन्मान केला. तसेच एवढ्या मोठ्या प्रवासाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस करत काळजी घेण्याचे सुचवले. या प्रसंगी बाभळगाव निवासस्थानी स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# प्राचार्य सलगरे यांचे साहित्य माणुसकीचा धर्म शिकवणारे




**लातूर/प्रतिनिधी:** सिध्दहस्त साहित्यिक प्राचार्य मधुकर सलगरे यांचे साहित्य हे माणुसकीचा धर्म शिकवणारे आहे. त्यांच्या प्रत्येक ग्रंथात तर्कशास्त्राचा अभ्यास करुन जीवन उपयोगी माहिती देण्यात आली आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. जयद्रथ जाधव यांनी केले.

राजे मल्हारराव होळकर ट्रस्ट लातूरतर्फे ग्रंथ प्रकाशन आणि पुरस्कार वितरण समारंभ लातूरमधील भालचंद्र ब्लड बँक सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात ते बोलत होते.

प्राचार्य मधुकर सलगरे लिखित जीवनधर्म चिकित्सा, भूगोलासह या पाचव्या ग्रंथाचे प्रकाशन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिव्य मराठीचे स्टेट हेड सुभाष बोंद्रे हे उपस्थित होते.

या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सोपानराव जटाळ, डॉ. राजेश पाटील, डॉ. हनुमंत किनीकर, डॉ. हमीद चौधरी, अशोकराव काळगे, डॉ. लक्ष्मण शिवणेकर, प्रवीण देशमुख, अशोक नारनवरे आदी उपस्थित होते. या समारंभात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल राजे मल्हारराव होळकर ट्रस्टच्या वतीने पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. यामध्ये डॉ. शिवणेकर, डॉ. हमीद चौधरी, प्रवीण देशमुख, डॉ. हनुमंतराव किनीकर, डॉ. अशोक नारनवरे, साधनाताई शेटे, संभाजीराव सूळ, अमोल पांढरे, चन्नवीर भद्रेश्वरमठ आदींचा समावेश होता.

या समारंभात डॉ. अशोक नारनवरे, डॉ. लक्ष्मण शिवणेकर, डॉ. हमीद चौधरी आदींनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. मधुकर सलगरे यांनी प्रास्ताविक करुन ग्रंथाविषयी भूमिका मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता खडके यांनी केले तर आभार चंद्रकांत हजारे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सतीश मोरे, उज्ज्वलकुमार माने, उमेश घोडके, अनिता खडके, मनोज अंबुरे, सुधीर भास्करे, राजपाल भंडे, साई सलगरे, नरसिंग काळे, प्रणव रणदिवे, प्राजक्ता रणदिवे आदींनी परिश्रम घेतले.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के

कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले टिकाऊ रबरी शिक्के तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८, २४५४०९



# लोकनेते विलासराव देशमुखसाहेब यांच्या जयंती निमित्त लातूर जिल्हा बँकेकडून अभिवादन

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी मुख्यमंत्री लोकनेते शेतकऱ्यांचे आधारवड विलासरावजी देशमुख साहेब यांच्या ८१ व्या जयंती निमित्ताने लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्यालयात लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले आठवणीचा उजाळा देण्यात आला

यावेळी जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव संचालक पृथ्वीराज सिरसाठ एन आर पाटील,राजकुमार पाटील,अशोक गोविंदपुरकर मारोती पांडे,संचालिका सौ स्वयप्रभा पाटील,संचालिका श्रीमती लक्ष्मीबाई भोसले, उदगीर बाजार समितीचे उपसभापती प्रीती भोसले, कार्यकारी संचालक हणमंतराव जाधव, मीडिया समन्वयक हरीराम कुलकर्णी जिल्हा सहकारी बोर्ड उपाध्यक्ष राजेन्द्र पटवारी महिला काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सौ ज्योती पवार,अहमदपूर बाजार समितीचे उपसभापती संजय पवार बाबुराव जाधव शहाजी पाटील यांच्यासह मान्यवर,शेतकरी बँक अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# लातूरमध्ये मटका अड्ड्यावर डीआयजी पथकाचा छापा

## ५१ लाखांचा मुद्देमाल जप्त, ५९ जणांवर ३८ गुन्हे

**लातूर/प्रतिनिधी :** नांदेड परिक्षेत्रात सुरू असलेल्या अवैध व्यवसाय विरोधी विशेष मोहिमेला वेग आला असून, पोलीस उप महानिरीक्षक (डीआयजी) यांच्या अधिपत्याखालील विशेष पथकाने लातूर शहरातील मटका अड्ड्यावर धडक कारवाई करत मोठा पर्दाफाश केला आहे. शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत शिवाजी महाराज चौक ते दयानंद महाविद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यालगत सुरू असलेल्या मटका अड्ड्यावर छापा टाकून पोलिसांनी मटका खेळविणाऱ्या व खेळणाऱ्या ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या कारवाईत आरोपींकडून रोख रकमेसह २ लाख ५७ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात १ ते ३१ मे २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या अवैध व्यवसाय विरोधी मोहिमेच्या २५ व्या दिवशी विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात कारवाया करण्यात आल्या. काल दिवसभरात अवैध गुटखा विक्री करणाऱ्या तीन जणांविरुद्ध कारवाई करून त्यांच्याकडून तब्बल २७ लाख १ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याशिवाय, मटका व जुगार अड्ड्यांवर धाड टाकत ११ जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत सहा गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून ५५ हजार ६२० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. अवैध दारू विक्री करणाऱ्या १६ जणांविरुद्ध १६ गुन्हे दाखल करून २७ हजार ६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवरही पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारत दोन गुन्हे दाखल केले असून, त्यांच्याकडून १५ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, अवैधरित्या गोवंश वाहतूक करणाऱ्या तीन जणांविरुद्ध गुन्हे दाखल करून ५ लाख ४२ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याशिवाय, शस्त्र अधिनियमांतर्गत तीन तर कोटपा कायद्यांतर्गत सहा कारवाया करण्यात आल्या. एकूणच, अवैध धंद्यांविरोधातील या व्यापक मोहिमेदरम्यान ५९ इसमांविरुद्ध ३८ गुन्हे दाखल करण्यात आले असून, आरोपींकडून ५० लाख ९७ हजार ११० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याने अवैध व्यवसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

# लोकनेते विलासराव देशमुख यांच्या जयंती निमित्त जागृति शुगर कडून सामाजिक उपक्रम

## शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण अभिवादन

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी मुख्यमंत्री लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या ८१ व्या जयंती निमित्ताने तळेगाव तालुका देवणी येथील जागृति शुगर अँड अलाईंड इंडस्ट्रीजच्या वतीने कारखाना स्थळी मंगळवारी लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या स्मृती स्थळी अभिवादन करण्यात आले तर तळेगाव बालाजी वाडी अचवला येथील जिल्हा परिषद शाळेतील ३०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले यात स्कूल बॅग कंपास पॅड यांचा समावेश आहे कारखाना स्थली उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.



यावेळी जागृति शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे रेणा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष यशवंतराव पाटील जागृति शुगर चे संचालक दिलीप माने जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शिवाजीराव केंद्रे,जिल्हा बँकेचे संचालक दिलीप पाटील नागराळकर प्रा शशिकांत कदम, संभाजी रेड्डी तळेगाव येथील उपसरपंच धनाजी जाधव,वलांडीचे सरपंच राम भंडारे,बालाजी कारभारी, धनराज चीद्रे, माधवराव पाटील, मुस्ताक कादरी, मालबा घोन्से धनाजी कोटे भीमा खुंटेगावे तात्याराव निडवंचे कारखान्याचे जनरल मॅनेजर गणेश येवले,मुख्य शेतकी अधिकारी रामानंद कदम,मुख्य अभियंता अतुल दरेकर,उप अभियंता अक्षय सूर्यवंशी, केमिस्ट गंगाधर जाधव, डिस्टिलरी प्रमुख विलास जाधव, बिसलरी डेप्युटी इन्चार्ज दिलीप काशीद ऊस पुरवठा अधिकारी लक्ष्मण बिराजदार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# लिंबाळवाडीत मारहाणीत एकाचा मृत्यू

**नळेगाव/अजगर मजकुरी :** चाकूर तालुक्यातील लिंबाळवाडी येथे घरगुती वादावरून झालेल्या मारहाणीत एकाचा मृत्यू झाला आहे. दोनजण किरकोळ जखमी झाले आहेत. यामध्ये पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघांना अटक करण्यात आली आहे.



पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीवरुन, लिंबाळवाडी येथे रविवारी (ता.१७) रात्री १० वाजण्याच्या सुमारास घरगुती वादावरून मारामारी झाली होती. यामध्ये चाकूर पोलिसात मारहाणीचा या मारामारी दगडू शिवाप्पा मोरकांडे हा गंभीर जखमी झाला होता. दत्ता दगडू मोरकांडे व वैजनाथ महादेव किडीले हे किरकोळ जखमी झाले होते.

दगडू शिवाप्पा मोरकांडे (वय ६०) याना लातूर येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान मंगळवारी (ता.२६) सकाळी नऊ वाजता मृत्यू झाला.

दत्ता दगडू मोरकांडे याच्या फिर्यादीवरून सागर मिरचे (वय २५),महानंदा मिरचे (वय ५०) दोघे (रा.शिरूर अनंतपाळ ) ,वैजनाथ महादेव किडीले (वय ३१),स्वाती दत्ता मोरकांडे (वय २८), महादेव किडीले (वय ६५) तिघेही रा.लिंबाळवाडी याच्यावर गुन्हा चाकूर पोलिसात दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, पोलिस उपविभागीय अधिकारी गजानन भातलवंडे,पोलिस निरीक्षक बालाजी भंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक रमेश चव्हाण, सिध्देश्वर जाधव,शिरीष नागरगोजे, ज्ञानोबा पाटील, शिंदे, बालासाहेब चाटे यांनी खुनाचा गुन्हा दाखल होताच. दोन पथक तयार करून टेक्नॉलॉजीचा वापर करून सागर मिरचे व स्वाती मोरकांडे या दोघांना राजीव गांधी चौक लातूर पळून जाण्याच्या तयारीत असताना मंगळवारी (ता.२६ )अटक करण्यात आली.

मयत दगडू मोरकांडे यांच्यावर मंगळवारी (ता.२६ ) याच्यावर संध्याकाळी सात वाजता अंत्यविधी करण्यात आला. यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परीवार आहे.

# विलास साखर कारखान्याचा स्त्सुत्य उपक्रम

**लातूर/प्रतिनिधी : :** लोकनेते विलासराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त मातोश्री वृद्धाश्रमात अन्नधान्य वाटप सामाजिक बांधिलकी जपत कारखान्याच्या वतीने व्यक्त करण्यात आली कृतज्ञता

लातूर (प्रतिनिधी): २६ मे २०२६ महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि माजी केंद्रीय मंत्री लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या ८१ व्या जयंतीनिमित्त लातूरमध्ये विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या जयंतीचे औचित्य साधून विलास सहकारी साखर कारखाना लि., वैशालीनगर (निवळी) यांच्या वतीने लातूर येथील 'मातोश्री' वृद्धाश्रमात अन्नधान्य वाटप करून एक आदर्श सामाजिक कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

मंगळवार, दि. २६ मे रोजी सकाळी सर्वप्रथम विलास सहकारी साखर कारखान्याच्या स्थळावर आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमाला कारखान्याचे व्हाईस चेअरमन तथा माजी आमदार वैजनाथराव शिंदे, आणि कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कारखाना स्थळावरील अभिवादन कार्यक्रमानंतर मातोश्री वृद्धाश्रमात जाऊन अन्नधान्य वाटपाचा कार्यक्रम पार पडला.

विलास साखर कारखान्याने नेहमीच व्यावसायिक यशासोबतच सामाजिक कर्तव्याची जाणीव ठेवली आहे, या अन्नधान्य वाटप उपक्रमामुळे



वृद्धाश्रमातील जेष्ठांनी कारखान्याच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या विचारानुसार सामाजिक बांधिलकी जपत आयोजित केलेल्या या उपक्रमाप्रसंगी कारखान्याचे संचालक मंडळ आणि अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी कारखान्याचे संचालक सर्वश्री रविंद्र काळे, अमृत जाधव, अनंत बारबोले, नरसिंग बुलबुले, गोवर्धन मोरे, रंजीत पाटील, रसुल पटेल, तात्यासाहेब पालकर, हणमंत पवार, नेताजी साळुंके (देशमुख), रामराव साळुंके, दिपक बनसोडे, शाम बरुरे, सुभाष माने व रमेश देशमुख यांच्यासह कारखान्यातील इतर वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बकरी ईद ..

हजरत इब्राहिमची
परिक्षाघेतली मोठी
कुर्बानीचा महोत्सव
अमोल रत्नांची पेटी

दिवस भराचे रोजे
पुण्य करोडो पाठी
ते चंद्र दर्शना नंतर
सुखाचा घास ओठी

सर्व धर्मीय जेवतात
एकत्र एकाचं ताटी
भूकती एक सारखी
असते सगळ्यापोटी

विविधजातीचे लोक
मारे एक दुजा मिठी
शेजारी सुखे बसले
माणसे लहान मोठी

अल्लाह देव शिकवे
वाटून खायची रोटी
अन्नाला उच्च स्थान
आशीष मिळे कोटी

पाच वेळेला नमाज
भाग्य बदले ललाटी
तन मन शुद्ध बनले
रोजाचे सत्कर्म पाठी

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

# लातूर शहरातील ९ परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

## महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित पूर्व परीक्षा रविवारी

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे रविवार, ३१ मे २०२६ रोजी महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ आयोजित करण्यात आली असून, या परीक्षेच्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी लातूर शहरातील परीक्षा केंद्रांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये शहरातील ९ परीक्षा उपकेंद्रांच्या १०० मीटर परिसरामध्ये हे प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा ३१ मे रोजी सकाळी १० ते दुपारी १२ आणि दुपारी ३ ते सायंकाळी ५ अशा दोन सत्रांमध्ये पार पडणार असून हे आदेश परीक्षेच्या दिवशी सकाळी ०८.०० वाजेपासून ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत लागू राहतील. या आदेशानुसार परीक्षा केंद्र परिसरात प्रवेश करतेवेळी परीक्षार्थी व्यतिरिक्त ५ किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्रितरीत्या प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपऱ्या, टायपिंग सेंटर्स, एसटीडी बूथ आणि ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवावी लागणार आहेत. परीक्षा सुरळीत व शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी केंद्र परिसरात कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यास, शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करण्यास आणि कोणत्याही अनाधिकृत व्यक्ती वा वाहनास प्रवेश करण्यास सक्त मनाई असेल. याशिवाय परीक्षा केंद्र परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर कोणतीही प्रसार माध्यमे घेऊन प्रवेश करण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. हे प्रतिबंधात्मक आदेश परीक्षा उपकेंद्रावर कार्यरत असणारे अधिकारी, कर्मचारी, परीक्षार्थींवर निगराणी ठेवणारे पर्यवेक्षक आणि पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या परीक्षाविषयक कर्तव्याच्या अनुषंगाने लागू असणार नाहीत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

लातूर शहरातील नांदेड रोडवरील यशवंत विद्यालय, खाडगाव रोडवरील सरस्वती विद्यालय, नांदेड रोडवरील जिजामाता कन्या प्रशाला, नारायण नगरमधील परिमल माध्यमिक विद्यालय, दयाराम रोडवरील श्री गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालय, सरस्वती कॉलनीतील श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शाहू चौकातील ज्ञानेश्वर विद्यालय, नंदी स्टॉप येथील पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन (पॉलिटेक्निक) महाविद्यालय आणि श्याम नगरमधील श्री केशवराज विद्यालय येथे परीक्षा होणार आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंग कामे**

ई-निविदा सूचना (पुनःआमंत्रण) निविदा सूचना क्र. SUR-N-T- 2026-27-15 दिनांक: -२५.०५.२०२६

डीआरएम (एस अँन्ड टी) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांकरिता सक्षम व प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळा www.ireps.gov.in वर ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित करत आहे:-**अनु. क्र.: १, कामाचे नाव व ठिकाण:** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात जिओग्रिड आणि जिओ-टेक्स्टाईल पद्धतीचा वापर करून केल्या जाणाऱ्या BCM कामाशी संबंधित सिग्नलिंग कामे., **निविदा क्र.: SUR-N-T-2026-27-15**, **कामाचा अंदाजित खर्च:** रु. ८२,६८,७१३.८४, **निविदा अर्जाची किंमत:** शून्य, **जमा करावयाची अनामत रक्कम:** रु. १,६५,४००, **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** २५/०६/२०२६ रोजी १५.३० वाजल्यानंतर., कामाचा सविस्तर तपशील ireps संकेतस्थळावर उपलब्ध आहे. कोणतीही शुद्धिपत्रके/दुरुस्त्या असल्यास, त्या केवळ वरील ई-खरेदी संकेतस्थळावरच अपलोड केल्या जातील. केवळ ऑनलाईन निविदाच स्वीकारल्या जातील. प्रत्यक्ष/टपालाद्वारे/ई-मेल, फॅक्स किंवा हाताने सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करावे आणि त्याची नोंदणी **www.ireps.gov.in** या संकेतस्थळावर करावी., अनामत रक्कम (EMD) भरणा नेट बँकिंग, पेमेंट गेटवे किंवा बँक हमी स्वरूपात स्वीकारला जाईल; तसेच, बँक हमीची मूळ प्रत निविदा सादर करण्याची अंतिम तारीख संपण्यापूर्वी (म्हणजेच, निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाव्यतिरिक्त इतर दिवशी), निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या नियुक्त अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष जाऊन जमा करणे आवश्यक आहे., अधिक तपशीलांसाठी कृपया **www.ireps.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्या.

20 DRM ST शाखा,सोलापूर

आपल्या जनावरांना रेल्वे रुळांपासून दूर ठेवा.

**MAHAVITARAN**
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**Tender Notice**
**(T-02/26-27)**

**The Chief Engineer, Latur Zone, Latur** invites e-tender viz, T-02/2026-27 from reputed and e-registered reputed firms/manufacturers/Company for the work of **"Providing and fixing of 33 KV Isolators for Lines and other allied works under Latur Zone,** Maharashtra State

The important dates are as below,

1) Sale of Tenders :- 27.05.2026 00.00 hrs. onwards
2) Last date of submission :- 08.06.2026 upto 15.00 hrs.
3) Opening of technical Bids :- 08.06.2026 @ 16.00 hrs.
4) Opening of price Bids :- To be notified later on.

For further details of Invitation for Bids & Bid Documents please visit our website **https://etender.mahadiscom.in/eatApp/**

**PRO 71/2026-27** **Chief Engineer, Latur Zone, Latur**

**निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र**

**सितारी विमा सेवा केंद्र**

दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.

वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत

**जमीरोद्दीन सितारी**
चेअरमन क्लब मेंबर CLIA

एजंट भरती चालू आहे.

**Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396**

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६